बुधवार, ७ फेब्रुवारी २०२४
किमत ५ रुपये | छत्रपती संभाजीनगर (महाराष्ट्र)
मराठी दैनिक
वर्ष - ०३ अंक - १७०
आरएनआय : एमएएचएमएआर/२०२१/८२५६६

# आधुनिक केसरी

विश्वव्यापी मराठी दैनिक

MARATHI ● DAINIK ● CHHATRAPATI SAMBHAJINAGAR (MAHARASHTRA) WEDNESDAY 7 FEBRUARY 2024 adhunikkesari.com ● YEAR-03 ● ISSUE-169 ● RNI : MAHMAR/2021/82566 ● PAGE-12 ● PRICE-05



YouTube
दैनिक आधुनिक केसरीचे लोकप्रिय यू-ट्यूब चॅनल घेऊन येत आहे...

एक नवे दमदार मुलाखतींचे सदर

माझा प्रेरणादायी प्रवास

आपण आयुष्याच्या प्रवासात संकटांवर केलेली मात आणि मिळवलेले उत्तुंग यश पुढच्या पिढ्यांना प्रेरणा देणारे असेल तर आम्ही आपली विशेष व्हिडिओ मुलाखत घेऊ. आपल्या जीवनप्रवासाच्या एका चित्रफितीसह ही मुलाखत जगभरात पोहचेल दैनिक आधुनिक केसरीच्या यू-ट्यूब चॅनलद्वारे.

सज्ज व्हा जगाला प्रेरणा देण्यासाठी !

आपल्या मुलाखतीसाठी आमच्याशी संपर्क करा

9075716739 7743918559 7620838883



## गिरिजा प्रकल्पात तेरा टक्के पाणीसाठा शिल्लक

### पाणी पिण्यासाठीच राखीव ठेवण्याची ग्रामस्थांची मागणी

आधुनिक केसरी न्यूज

**सचिन गवळी**

**बाजार सावंगी :** खुलताबाद शहरासह तालुक्यातील अनेक गावांची तहान भागवणारा येसगाव येथील गिरीजा मध्यम प्रकल्प या प्रकल्पात हिवाळ्याच्या शेवटी फेब्रुवारी महिन्याच्या सुरूवातीला फक्त 13 टक्के पाणीसाठा शिल्लक आहे. अजून पुढे पूर्ण उन्हाळा जायचा बाकी आहे अजून उन्हाळा सुरुवात ही झाला नाही तर आज रोजी फक्त 13 टक्के पाणीसाठा या प्रकल्पात शिल्लक आहे. त्यामूळे पुढे उन्हाळ्यात पाणी टंचाईच्या झळा जाणवू शकतात. एकिकडे प्रकल्पात पाणीसाठा अत्यंत कमी असून दूसरीकडे या प्रकल्पाच्या एका कालव्यातून दररोज मोठया प्रमाणात पाणी वाया जात आहे कारण एका कालव्यातून पाण्याची गळती सुरू आहे. ही पाण्याची गळती गेल्या कीत्येक दिवसांपासून सुरु असून ही पाणी गळती बंद करण्याचा साधा प्रयत्नही पाटबंधारे विभागातर्फे केला गेला नाही याकडे सर्रासपणे दुर्लक्ष केले जात आहे. गेल्या वर्षी समाधानकारक पाऊस न झाल्याने नद्यांना मोठ्या प्रमाणात पूर आलेच नव्हते. त्यामुळे प्रकल्पात पाणी आलेच नाही आता मागे जे काही पावसाळ्याच्या नंतर अवकाळी पाऊस झाला त्यावेळेस या प्रकल्पात जवळजवळ आठ ते दहा टक्के पाणी साठ्यात वाढ झाली होती आणि अजून उन्हाळा लागलाही नाही तर या ठिकाणी फक्त 13 टक्के पाणीसाठा शिल्लक असून हे पाणी पिण्यासाठीच राखीव ठेवण्यात यावे, अशी मागणी ग्रामस्थांतून होत आहे.

## मराठवाड्यात पाच महिन्यांत कृष्णेचे पाणी

### आ. राणा जगजितसिंह पाटील

आधुनिक केसरी न्यूज

**धाराशिव : दोन तपापूर्वी सुरू झालेल्या कृष्णा मराठवाडा योजनेला मूर्त रूप आले आहे. राज्य सरकारने गेल्यावर्षी ११ हजार ७२६ कोटी निधी खर्चास सुधारीत प्रशासकीय मान्यता दिल्यानंतर कृष्णा मराठवाडा योजना क्र. १ आणि २ च्या टप्प्यातील कामे प्रगतीपथावर आली आहेत. सध्या ७० टक्के कामे पूर्ण झाली आहेत. घाटणे बॅरेजपासून पुढे तुळजापूरच्या रामदरा तलावापर्यंत ६३ किलोमीटरचे काम पुढील पाच महिन्यात पूर्ण होईल, अशी माहिती भाजपाचे आमदार राणाजगजितसिंह पाटील व धाराशिव पाटबंधारे मंडळाचे अधीक्षक अभियंता भारत शिंगाडे यांनी दिली.**

भाजपाचे आमदार राणाजगजितसिंह पाटील यांनी कृष्णा मराठवाडा प्रकल्पांतर्गत उपसा सिंचन योजना क्र. २ अंतर्गत सुरू असलेल्या घाटणे, पडसाळी ते रामदरा तलावापर्यंतच्या विविध कामांचा पत्रकारांना घेऊन पाहणी दौरा आयोजित केला होता. या दौऱ्यात घाटणे बॅरेजच्या कामाची पाहणी करण्यात आली. या बॅरेजपासून तुळजापूरच्या रामदरा तलावापर्यंतचे ६३ किलोमीटर अंतराचे काम जूनपर्यंत पूर्ण करण्याचे उद्दिष्ठ यंत्रणेने ठेवले आहे. हे काम सध्या प्रगतीपथावर असून या ठिकाणी ८४ एचपीचे चार पंप बसविण्यात येणार आहेत. सीना नदीपात्रात वेगवेगळ्या पाणीस्त्रोतातून जमा होणाऱ्या २.२४ टीएमसी पाणी उचलून ते सीना कोळेगाव धरण अधोबाजून गुरूत्वीय बंद नलिकेद्वारे सीना नदीत सोडून पुढे हेच पाणी कॅनॉल आणि आवश्यक त्या ठिकाणी बंद नलिकेद्वारे पाणी उचलून तुळजापूरच्या रामदरा तलावात साठवले जाणार आहे. योजना क्र. २ अंतर्गत करण्यात येणाऱ्या बॅरेज, बंद नलिका आणि कॅनॉलसाठी ६०९ कोटींचा निधी प्राप्त झाला आहे. घाटणे बॅरेजपासून ६३ किलोमीटर असलेल्या रामदरा तलावापर्यंतचे हे काम मे महिन्यापर्यंत संपविण्याचे उद्दिष्ट यंत्रणेसमोर आहे.

## निधी देणार अन् प्रश्न मार्गी लावणार; अजित पवारांनी शब्द पाळला

### शिरसमणी येथे फटाक्यांच्या आतषबाजीत निर्णयाचे स्वागत


आधुनिक केसरी न्यूज

कळवण : ओतूर लघुपाटबंधारे प्रकल्पाला मीं निधी देणार अन प्रश्न मार्गी लावणार हा शब्द उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी आमदार नितीन पवारासमवेत शिष्टमंडळातील शेतकऱ्यांना गेल्या महिन्यात दिला होता.तो शब्द आज खरा करुन दाखवत या प्रकल्पाच्या कामासाठी नामदार पवार यांनी ६५ कोटी ३३ लाख रुपयांची सुधारीत प्रशासकीय मान्यता दिली. गेल्या ४५ वर्षांपासून प्रलंबित पाणी प्रश्न सुटणार असल्यामुळे या शिष्टमंडळात सहभागी शेतकऱ्यांनी शिरसमणी येथे एकत्र येत एकमेकांना पेढे भरवून या निर्णयाचे स्वागत करत शिरसमणीमध्ये जोरदार फटाक्यांची अतिशबाजी केली.उपमुख्यमंत्री अजित पवार व आमदार नितीन पवार यांच्या नावाचा जयघोष करत यां निर्णयाचे स्वागत केले. मंत्रालयात सकाळी १० वाजता उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या अध्यक्षतेखाली सुधारीत प्रशासकीय मान्यतेच्या प्रस्तावावर निर्णय घेण्यासाठी व्यय अग्रक्रम समितीच्या बैठक आयोजित करण्यात आली होती.या बैठकीत जलसंपदा विभागाकडील ओतूर लघुपाटबंधारे प्रकल्पाच्या विशेष दुरुस्ती कामासाठी ६५ कोटी ३३ लाख रुपयांची प्रथम सुधारीत प्रशासकीय मान्यता देण्यात आली. या बाबतची माहिती आमदार नितीन पवार यांनी शेतकऱ्यांना दिल्याचे वृत्त ओतूर परिसरात धडकताच परिसरातील शेतकऱ्यांनी शिरसमणी येथे जिल्हा परिषदेच्या माजी अध्यक्षा सौं जयश्री पवार, कळवणचे नगराध्यक्ष कौतिक पगार,युवा नेते ऋषिकेश पवार,बाजार समितीचे संचालक सुधाकर खैरनार यांच्या उपस्थितीत एकमेकांना पेढे भरवून आनंदोत्सव साजरा केला. यावेळी छोटेखानी सभा होऊन सभेत जिल्हा परिषदेच्या माजी अध्यक्षा सौं जयश्री पवार यांनी मनोगत व्यक्त केले. ओतूर परिसरातील गेल्या ४५ वर्षांपासून प्रलंबित ओतूर ल पा प्रकल्पाचा प्रश्न सोडविण्यात आमदार नितीन पवार यांचे प्रयत्न यशस्वी झाल्याबद्दल व प्रकल्पास सुधारीत प्रशासकीय मान्यता दिल्याबद्दल उपमुख्यमंत्री अजित पवार यांचे अभिनंदन यावेळी करण्यात आले. यावेळी बळीराम देवरे, नामदेव खैरनार, अतुल देवरे, रविकांत सोनवणे, मावजी गायकवाड, बाळासाहेब देवरे, दिगंबर पवार, शंकरराव निकम, हिरामण वाघ, उन्मेष वाघ, रमेश वाघ, सुनील वाघ, समाधान देवरे, नंदू देवरे सुरेश शिरसाट, दीपक वाघ, मधुकर वाघ, श्रीकांत वाघ, नितीन वाघ, लालू वाघ, महेंद्र सागर, गिरीश वाघ आदीसह शेतकरी मोठया संख्येने उपस्थित होते.

> ओतूर प्रकल्पाचे स्व ए टी पवारांनी पाहिलेलं स्वप्न पूर्ण करायचे असल्यामुळे या प्रश्नी मंत्रालय स्तरावर पाठपुरावा सुरु होता . या संदर्भात शेतकरी बांधवासमवेत २/३ बैठका मंत्रालयस्तरावर झाल्या होत्या . उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी ओतूर प्रकल्पासाठी मीं निधी देणार अन प्रश्न मार्गी हा शब्द दिला होता . आजच्या बैठकीत प्रस्तावास प्रशासकीय मान्यता दिल्यामुळे याचा मला मनस्वी आनंद आहे .
>
> **आमदार नितीन पवार, कळवण**





विश्वास देशपांडे
संपर्क क्र. 9403749932

आधुनिक केसरी

स्वराज्य मिळालं म्हणजे वर्षानुवर्षे दडपल्या गेलेल्या देशवासियांचा आवाज बुलंद होईल, प्रगतीच्या वाटा खुल्या होतील, जनतेचा आवाज हा देशाचा आवाज होईल, स्वातंत्र्यसूर्याच्या प्रकाशात जीवन उजळून निघेल ही सर्वसामान्यांच्या मनातील आशा. तिला अंकुर फुटले. पंडित नेहरू, सरदार पटेल, आचार्य कृपलानी, सरोजिनी नायडू, डॉ आंबेडकर, लाल बहादूर शास्त्री, सुभाष बाबू ,राजगोपालाचारी, पंडित मदन मोहन मालवीय हे सगळे आणि असे अनेक दिग्गज नेते जनतेवर प्रभाव गाजवीत होते. त्यांच्या देशप्रेम आणि त्याग या गुणांचा जनमानसावर प्रचंड प्रभाव पडलेला. गांधीजींची सूतकताई घरोघरी पोहोचलेली. चरख्यावर कातलेल्या सुताची शुभ्र वसने ल्यायलेले त्यागी पुढारी. डोक्यावर गांधी टोपी. या टोपीचा दिमाख, बडेजाव अजिबात नाही. साधी, स्वच्छ धुतलेली टोपी डोक्यावर शोभून दिसायची. इस्त्री असली काय आणि नसली काय फारसा फरक पडत नव्हता. गांधीजींसह ही सगळी मंडळी आपल्याला स्वातंत्र्यानंतर शिताची, सुताची आणि छताची ( अन्न, वस्त्र, निवारा ) सोय करतील. स्वराज्य आपले असेल अशी सामान्य जनतेच्या मनातील भावना. ब्रिटिश काळात जनतेवर अन्याय, अत्याचार करणारे सरकारी अधिकारी, बाबू आता या बदलत्या काळात खादीधारी आणि गांधीटोपी परिधान केलेल्या नेत्यांपुढे कमालीचे नम्र होताना पाहून स्वराज्यातील सुखद चित्र सर्वसामान्यांच्या डोळ्यासमोर उभे राहत होते. ' द कम्युनल ट्रँगल इन इंडिया ' या नावाचं एक पुस्तक अच्युतराव पटवर्धन आणि युसूफ मेहेरअली यांनी लिहिलं होतं. त्यात हिंदू आणि मुसलमान म्हणजे त्रिकोणाच्या दोन बाजू आणि तिसरी बाजू म्हणजे ब्रिटिश सरकार असं प्रतिपादन केलं होतं. स्वराज्य आलं की ब्रिटिश सरकार नामक तिसरी बाजू नष्ट होईल आणि हिंदू आणि मुस्लिम या दोन बाजू ज्याप्रमाणे स्वातंत्र्यासाठी एकजूट होऊन लढत होत्या तशा एक होतील अशी भाबडी आशा लोकांना वाटत होती. स्वराज्य दृष्टीपथात आलं. पण स्वराज्याच्या चित्रातील कल्पित सुखद रंग जाऊन भलतेच चित्र दिसायला लागले.






## आनंदी पहाट

# मूल्य आणि अध्यात्म अभ्यासणे आवश्यक

आधुनिक केसरी

आपल्या जीवनाचा अर्थ जाणून घेणे हे बहुतेकांसाठी आध्यात्म महत्त्वाचे असण्याचे मुख्य कारण आहे.आध्यात्मवाद, काहीतरी पवित्रता शोधण्यासाठी, लोकांना एक चांगली व्यक्ती बनण्यासाठी प्रयत्न करण्यास प्रोत्साहित करते. एक व्यक्ती म्हणून तुम्ही कोण आहात यावर चिंतन केल्याने सर्वसाधारणपणे मानवी अस्तित्वाचा अर्थ काय याविषयी तुमचे ज्ञान वाढू शकते. प्रार्थना, मंत्र आणि ध्यान यांसारखे आध्यात्मिक आरोग्य लागू करण्याचे अनेक मार्ग आहेत. आध्यात्मिक विकास हा अंशतः एखाद्याचा अंतर्बाह्य गतिमान प्रवास परस्पर प्रक्रिया आहे. या क्रमिक वाढीमध्ये सामान्यतः विकासाच्या तीन टप्प्यांचा समावेश होतो; शुद्धीकरण अवस्था, प्रकाशमय अवस्था आणि एकात्मक अवस्था ह्या होत. आपल्या मानवी विकासाच्या टप्प्यांचे ते प्रतिबिंब दाखवतात जसे, बालपण, किशोरावस्था आणि प्रौढत्व ही होय. आपल्या आध्यात्मिकतेत आपण स्वतः आपल्या सर्वात सुंदर आणि शक्तिशाली स्वरूपात जीवनाचा प्रवास करत असतो. अध्यात्म आपल्याला शांतता, जीवनाचा उद्देश आणि क्षमा या भावना देऊन तणावाचा सामना करण्यास मदत करू शकते. भावनिक ताणतणावाच्या वेळी किंवा आजारपणाच्या वेळी ते अधिक महत्त्वाचे बनते. अर्थाच्या निर्मितीमध्ये आध्यात्मिक मूल्यांमध्ये ऊर्जा, विकास आणि आशा यांचा स्त्रोत निर्माण करणे समाविष्ट आहे. आध्यात्मिक वास्तवाला अस्तित्वात असलेल्या सर्व गोष्टींसाठी अंतिम अर्थ-निर्माता मानले जाऊ शकते. आध्यात्मिक वास्तवाची मानवी भावना सर्व ज्ञात संस्कृतींमध्ये आहे. नैतिक आरोग्य म्हणजे एखाद्या व्यक्तीची योग्य आणि चुकीची जाणीव, नैतिक पद्धतीने वागण्याची त्यांची क्षमता प्रतीत करत असते.



विद्यावाचस्पती विद्यानंद
संपर्क क्र. 7709612655



आधुनिक केसरी

## यशाची पायरी | तीच जाणा ||

अंधारल्या वाटा | संसारी तापाने ||
जीव गांजल्याने | शुद्ध गेली ||१||
बुडे व्यवहार | मंती गुंग झाली ||
दशा ऐसी आली | मागे भीक ||२||
भोग प्रारब्धाचे | भोगता श्रध्देने ||
वेदना मुक्याने | सौम्य होई ||३||
कठीण समयी | ठेवता विवेक ||
दीप तो सात्विक | तेजाळतो ||४||
सहनशीलता | नांदता अंतरी ||
यशाची पायरी | तिच जाणा ||५||




प्रा.ज्ञानेश्वर कुलकर्णी (वतनी)
संपर्क क्र. ९४०३०२९१७८

## निरुपण

आधुनिक केसरी

ते त्रिविध ताप ते कैसे । आतां बोलिजेत तैसे ।
येविषईं येक असे । वाक्याधार ॥८॥
श्लोक ॥ देहेंद्रियप्राणेन सुखं दुःखं च प्राप्यते ।
इममाध्यात्मिकं तापं जायते दुःक देहिनाम् ॥१ ॥
सर्वभूतेन संयोगात् सुखं दुःखं च जायते ।
द्वितीयतापसंतापः सत्यं चैवाधिभौतिकः ॥२ ॥

## घराघरात स्वर्वेद, मनामनांत स्वर्वेद, जनमनांत स्वर्वेद !



स्वर्वेद रचनाकार अनन्त श्री सद्गुरू सदाफल देवजी महाराज

नेत्र अग्र मन वास है,
जागृत में जग ज्ञान ।
मन मध्यम परमाण में, स्वप्न कण्ठ
स्थान ।।३६।।(स्वर्वेद द्वितीय मण्डल
सप्तम अध्याय) ०२/०७/३६

मूळ भाष्याचा मराठी अनुवाद : ज्यावेळी मन इंद्रियांना घेऊन बाह्य जगताचे कार्य करते, ती जागृत अवस्था असते. त्यावेळी मन डोळ्यांच्या समोर असते. मन ना जड आहे ना चेतन , म्हणून या दोह्यात मन मध्यम प्रमाणवालं आहे असे सांगितले आहे. जेव्हा मन बाहेरच्या विषयांना सोडून कंठात निवास करते, ती स्वप्न अवस्था असते. स्वप्नात कंठातील हिता नामक नाडीत मन निवास करते आणि अंतरात विषयांचे दर्शन करते. जागृत अवस्थे समानच स्वप्नही एक अवस्था आहे, जी मिथ्या नाही.

संदर्भ : हा ग्रंथ तुम्हाला हवा असल्यास वॉट्सॲप करा ८५५४८८३१६६.

## जाणपणनिरूपण

आधुनिक केसरी




सौ. उज्ज्वला धर्माधिकारी
संपर्क क्र. 7588235646

या समासात समर्थ आपल्याला सांगतात की सतत कार्यमग्न असावे. या साठी आपण दुसऱ्या दशकातील उत्तम लक्षण असलेला दुसरा समास अभ्यासला आहे. त्यामुळे उत्तम लक्षण कोणते हे आपल्याला माहित आहेच. समर्थ सांगतात की माणसांमध्ये उत्तम गुण असले पाहिजेत. आता हे उत्तम गुण कोणते? तर मनाचा मोठेपणा, कोणतेही काम करताना लहानमोठा हा भेदभाव असु नये. सेवा धर्म वाढवावा. सामर्थ्यवान असावे ,समाजात मान सन्मान मिळवावा हा मानसन्मान काही एका दिवसांत येत नाही. तर त्यासाठी समाजात मिसळून वागले पाहिजे. समाजातील दुःखी कष्टी लोकांना आधार दिला पाहिजे. आपले कौशल्य गुण वाढवले पाहिजेत. मनापासून दुबळ्या लोकांची सेवा केली पाहिजे. असहाय लोकांना मदत करण्यासाठी तुमचा मदतीचा हात सदैव पूढे असला पाहिजे.
हे गुण उत्तम गुणाचें लक्षण आहे छत्रपती शिवाजी महाराजांना "जाणता राजा" का म्हणतात हे या समासा वरून लक्षात येई. कारण समर्थांना अभिप्रेत असलेले सर्व गुण शिवरायांच्यात होते.प्रपंचात राहूनही परमार्थ करता येतो हे शिवरायांचे मावळे सुध्दा मान्य करतील. कारण त्यांनी आपल्या मावळ्यांना असे संस्काराचे बीज पेरले होते.

# परमार्थ कसा साधेल

आधुनिक केसरी



ज्याच्यापासून माया उत्पन्न झाली, त्याला शरण जावे. त्याला शरण जाण्याच्या आड काय येते ते पाहावे. कर्तेपण टाका म्हणजे शरण जाता येते. माझेपणाने मिरविता आणि अभिमान कायम ठेवता, मग भगवंताला शरण कसे जाता येईल ? आपण संताच्या दर्शनाला जातो, आणि बायकोचे दुखणे बरे व्हावे असे म्हणतो; मग ते दर्शन खरे झाले म्हणायचे का ? पोराबाळांकरता, बायकोकरता, संतांकडे नाही जाऊ. संतांनी नामस्मरण करायला सांगितले, परंतु मुलगा वाचत नाही असे पाहिले की आपली रामावरची, नामस्मरणावरची, श्रद्धा उडते म्हणजे मी विषयाकरिता नाम घेतो असेच झाले ! विषय सुटावेत असे वाटते, पण ते सुटतच नाहीत. याचे कारण आमची बलवत्तर इच्छाच नसते. संन्यास घ्यायला निघाला तर बायको पोर घेऊन आडवी येते; तिला दूर सारून निघाला, पण पुढे मोहात पडून परस्त्री करण्याची वेळ येते ! माणूस व्यसनाकरिता हे सर्व करतो, परंतु परमार्थाकरिता विषय आणि मोह दूर करून साधन कर म्हटले, तर निरनिराळ्या सबबी आपल्या डोळ्यांसमोर उभ्या राहतात. चोवीस वर्षे अभ्यास केला तरी पोटभर खायला मिळत नाही, मग परमार्थ मात्र दोन वर्षांत साध्य व्हावा असे कसे म्हणावे ? शांती ही परमार्थाची पहिली पायरी आहे. परमार्थ हा समजुतीचा आहे, उगीच कष्ट करण्याचा किंवा पारायणाचा नाही. बद्रीनारायणाची यात्रा करूनही तो साधणार नाही. त्यापेक्षा भगवंताच्या अनुसंधानात राहिल्याने जास्त फायदा होईल. काही खेळ जसे एकट्यानेच खेळायचे असतात, तसा परमार्थ हा आपल्याशीच करायचा खेळ आहे. तो आपल्याशीच करायचा अभ्यास आहे. खेळात काही बाह्य साधन तरी लागते, पण या अभ्यासात त्याचीही जरुरी नसते. परमार्थ हा वृत्ती सुधारण्याचा अभ्यास आहे. आपला परमार्थ जगाला जितका कमी दिसेल, तितका आपल्याला फायदेशीर आहे. जगातल्या मोठेपणात मुळीच सार्थक नाही. खरा मोठेपणा नसताना उगीच मोठेपणा वाटणे, हा तर फार मोठा घात आहे. अंतर्यामी स्थिर होणे, स्वस्थता येणे, सावधानता ठेवणे, दगदग सोडणे हाच परमार्थ होय. सतत आनंद मिळावा यासाठी प्रयत्न करणे, याचेच नाव परमार्थ. ‘ जग काय म्हणेल ’ म्हणून वागणे याचे नाव व्यवहार आणि ‘ भगवंत काय म्हणेल ’ म्हणून वागणे हाच परमार्थ. १५५. कर्तव्यात भगवंताचे स्मरण हेच परमार्थाचे सार.

## कान्होपात्रा

आधुनिक केसरी

अशा परिस्थितीत केवळ आपल्या भक्तीने तिने ईश्वरप्राप्ती करून घेतली. म्हणून संत कान्होपात्रा अद्वितीय ठरते. तिच्या भक्तीमुळे समाजही तिच्या पायाशी नतमस्तक झाला आणि तिला संतपद मिळालं.

आधुनिक केसरी

विश्वव्यापी मराठी दैनिक

बुधवार, ७ फेब्रुवारी २०२४





पान ६

# बदलत्या शिक्षण व्यवस्थेत नवीन तंत्रज्ञानाची भूमिका महत्त्वाची

## नांदेड दक्षिणचे आ. मोहनराव हंबर्डे यांचे प्रतिपादन

आधुनिक केसरी न्यूज

**मोहन पवार**

**लोहा :** बदलत्या काळात पारंपरिक अध्ययन -अध्यापन पद्धती ऐवजी विद्यार्थी केंद्रित शिक्षणाची गरज असून त्यात नवीन तंत्रज्ञानाचा उपयोग करून शिक्षकांनी अध्यापन करावे यासाठीच हे प्रशिक्षण दिले जात आहे. निश्चितच याचा विद्यार्थ्यांना फायदा होईल, असे प्रतिपादन नांदेड दक्षिणचे आमदार मोहन अण्णा हंबर्डे यांनी केले.

सोनखेडच्या जे.के.एम. प्राथमिक व माध्यमिक शाळा व संत गाडगे बाबा ज्यू.कॉलेज मध्ये लोहा तालुक्यातील शिक्षकांचे अध्ययन प्रक्रियेचे व्यवस्थापन व सातत्यपूर्ण सर्वंकष याचे चौथ्या टप्प्याचे प्रशिक्षण सुरू आहे. येथील प्रशिक्षणास भेट दिल्यानंतर त्यांनी छोटे खानी शिक्षकांशी संवाद साधला बदलत्या शिक्षण व्यवस्थेत



तंत्रज्ञानाचा उपयोग करून अध्ययन-अध्यापन सुलभ होण्यास मदत होणार आहे. शिक्षकांनी बोलायचे अन विद्यार्थ्यांनी ऐकायचे ही पद्धती आता बाजूला सारून वर्गात विद्यार्थ्यांनीच प्रश्न तयार करायची उत्तरे शोधायची जेणेकरून जे "आव्हान " समोर आहे त्याची सोडवणूक तो स्वतः करेन व शिक्षण प्रक्रिया सुलभ होईल. असे आ.मोहनअण्णा हंबर्डे यांनी सांगितले .माजी जि प सदस्य श्रीनिवास मोरे यांनी आपले मनोगत व्यक्त केले.

गटशिक्षणाधिकारी सतीश व्यवहारे ,शिक्षण विस्तार अधिकारी बी पी गुट्टे, अंजली कापसे , सरस्वती आंबलवाड यांच्या मार्गदर्शनाखाली हे पाच दिवशीय प्रशिक्षण सुरू आहे.

प्रशिक्षण समन्वयक संजय अकोले, सह नियंत्रक हवगी जामकर, तंत्र स्नेही सर्वजित धुतराज, विभागीय सुभलक म्हणून दत्तात्रय मोहिते, संभाजी भुरे,मोहन चौधरी, नागोराव जाधव, ओंमकार बोधनकर, एस पी केंद्रे, संतोष जोशी,विजयकुमार कोदले हे प्रशिक्षण देत असून यांच्यासह जी.एस. मंगनाळे, उध्दव मुळे,संतोष अंबुलगेकर,एल. बी.चव्हाण, प्रविण पाटील, बालाजी बनसोडे,डी. पी.बालाघाटे अशोक मोरे,संजय नागरगोजे,माधव फुलवळे, नागेश पुरी अर्पणा चाटे,अनुसया कोल्हे,मिनाक्षी वाडीकर,सुजाता कदम, लक्ष्मी कोकणे, यांच्यासह १६० शिक्षक उपस्थित आहेत.



# संजय गांधी निराधार योजनेसह इतर योजनांचे प्रलंबित प्रस्ताव मार्गी लावा : विवेक कोल्हे

आधुनिक केसरी न्यूज

**किसन पवार**

**कोपरगाव :** संजय गांधी निराधार योजना, इंदिरा गांधी राष्ट्रीय वृद्धापकाळ निवृत्तीवेतन योजना, श्रावणबाळ योजना व इतर लाभार्थ्यांनी व्यक्तिगत दाखल केलेले ११०० हून अधिक प्रस्ताव गेल्या सहा महिन्यांपासून तहसील कार्यालयात धूळ खात पडले आहेत. तालुक्याच्या लोकप्रतिनिधींना बैठक घेण्यास वेळ मिळत नसल्यामुळे सदर योजनांचे लाभार्थी शासकीय अनुदानापासून वंचित आहेत. प्रशासनाने वेळकाढूपणा न करता येत्या १९ फेब्रुवारीपर्यंत हे सर्व प्रलंबित प्रस्ताव मार्गी लावावेत, अन्यथा तहसील कार्यालयासमोर ठिय्या आंदोलन करण्यात येईल, असा इशारा स. म. शंकरराव कोल्हे स. सा. कारखान्याचे अध्यक्ष युवा नेते विवेक कोल्हे यांनी दिला.

कोपरगाव येथील तहसील कार्यालयात आढावा बैठक आयोजित केली जाते. त्यानुसार सोमवारी (५ फेब्रुवारी) विवेक कोल्हे यांच्या प्रमुख उपस्थितीत बैठक झाली. यावेळी कोल्हे यांनी जनतेचे प्रश्न सोडविण्यास अधिकारी चालढकलपणा करीत असल्याचा आरोप करून अधिकाऱ्यांना त्याचा जाब विचारला. तसेच आमदार काळे यांनी केलेल्या दुर्लक्षाने त्यांच्या निव्वळ फ्लेक्सबाजी कारभारावर कोल्हे यांनी टीकेची तोफ डागली.

ते म्हणाले, जुलै २०२३ मध्ये 'शासन आपल्या दारी' उपक्रमात माजी आमदार स्नेहलता कोल्हे यांच्या जनसंपर्क कार्यालयाने संजय गांधी निराधार योजना, इतर योजनांतर्गत प्रस्ताव दाखल केलेले होते. जवळपास १११६ प्रस्ताव अद्यापही प्रलंबित आहेत. त्यापैकी काही प्रस्ताव मंजुरीसाठी बैठकीची आवश्यकता नसतानाही तहसीलदारांनी अद्याप सदर प्रस्ताव मंजूर केले नाहीत. नोव्हेंबर २०२३ मध्ये संजय गांधी निराधार योजना समितीच्या अध्यक्षपदी आ. काळे यांची नियुक्ती झाली. मात्र, तेव्हापासून त्यांनी कोणतीही बैठक न घेतल्याने अनेक गरजू वयोवृद्ध व दिव्यांग व निराधार नागरिक शासकीय अनुदानापासून वंचित असून, लाभार्थ्यांचे जवळपास दीड कोटी रुपयांचे नुकसान झाले आहे. कोपरगाव मतदारसंघासाठी ३ हजार कोटीचा निधी आणल्याच्या खोट्या वल्गना करणाऱ्या आमदारांना बैठक घेऊन गोरगरिबांचे प्रस्ताव मार्गी लावण्यास वेळ मिळत नाही हे दुर्दैव आहे. त्यांच्या निष्क्रियतेमुळे अनेक लाभार्थी अनुदानापासून वंचित आहेत.

आतापर्यंत दर महिन्याला समस्या सुटण्यासाठी १७ वेळा बैठका घेऊन आम्ही जनतेचे प्रश्न व समस्या प्रशासनाकडे मांडत आहोत; पण अधिकारी कुणाच्या दबावात चालढकलपणा करत आहेत. सरकार विविध योजनांवर कोट्यवधींचा खर्च करत असतानाही योजना लाभार्थींपर्यंत पोहोचत नाहीत याला कोण जबाबदार ? प्रशासनाने लोकप्रतिनिधींच्या दबावाखाली येऊन संजय गांधी निराधार योजना व अन्य योजनांचे प्रस्ताव प्रलंबित ठेवून सर्वसामान्य नागरिकांना शासकीय अनुदानापासून वंचित ठेवू नये, असे आवाहन कोल्हे यांनी केले. प्रशासनाने जनतेचे प्रश्न तातडीने मार्गी लावावेत, अन्यथा आम्हाला तीव्र आंदोलन करावे लागेल, असा इशाराही त्यांनी दिला.

या बैठकीस अप्पर तहसीलदार विकास गंबरे, तालुका कृषी अधिकारी मनोज सोनवणे, नायब तहसीलदार कुलथे, शरद थोरात, कृ. उ. बा. समितीचे सभापती साहेबराव रोहोम, भाजपचे तालुकाध्यक्ष कैलास रहाणे, शहराध्यक्ष दत्ता काले, केशव भवर, मच्छिंद्र टेके, संभाजी रक्ताटे, रवींद्र पाठक, भाजयुमोचे तालुकाध्यक्ष विक्रम पाचोरे, सरपंच रवींद्र आगवन, दीपक चौधरी, अनुराग येवले, प्रदीप चव्हाण, बाळासाहेब पानगव्हाणे, उपसरपंच भगवान चव्हाण, जितेंद्र रणशूर, शफिक सय्यद, यांच्यासह भाजप, भाजयुमोचे पदाधिकारी, कार्यकर्ते, विविध योजनांचे लाभार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# दारू पिण्यासाठी पैसे न दिल्याने गावठी कट्ट्याचा धाक दाखवणारा आरोपी जेरबंद

आधुनिक केसरी न्यूज

**गणेशवाडी :** सोनई पोलीस स्टेशन हद्दीतील घोडेगाव ता. नेवासा येथे दिनांक १४ नोव्हेंबर रोजी दारू पिण्यासाठी पैसे न दिल्याचा राग धरुन रामदास पुंजाराम जाधव यांना गावठी कट्याचा धाक दाखवत खिशातील रोख रक्कम घेऊन पसार झालेला आरोपी निलकंठ मधुकर केदार यास सोनई पोलीसांनी घोडेगाव येथुन ताब्यात घेतले. सदर गुन्हयांचे गांभीर्य लक्षात घेवुन मा. पोलीस अधीक्षक, राकेश ओला साहेब, मा. अपर पोलीस अधीक्षक, मा. उपविभागीय पोलीस अधिकारी सुनिल पाटील साहेब यांनी सोनई पोलीस ठाण्याचे सहाय्यक पोलीस निरीक्षक आशिष शेळके यांना सदरचा गुन्ह्यातील आरोपी तात्काळ अटक करण्याबाबत सुचना देवुन मार्गदर्शन केले. त्या अनुषंगाने सोनई



पोलीस स्टेशनचे विशेष पोलीस पथक तयार केले. गुप्त बातमी दारामार्फत माहिती मिळाली की, सदर गुन्ह्यातील आरोपी निलेश उर्फ निलकंठ मधुकर केदार, रा. घोडेगाव . हा घोडेगाव येथे आल्याची माहिती मिळाल्याने पोहेकों आडकीत्ते, पोहेकॉ गावडे, पोकॉ पवार, पोकॉ क्षीरसागर, पोकॉ तमनर यांनी आरोपीचा घोडेगाव गावात सापळा रचुन शोध घेवुन त्यास ताब्यात घेतले.

सदरची कामगिरी ही पोलीस अधीक्षक, राकेश ओला साहेब, अपर पोलीस अधीक्षक, वैभव कलुबर्मे, मा. उपविभागीय पोलीस अधिकारी, सुनिल पाटील साहेब यांचे मार्गदर्शनाखाली सोनई पोलीस स्टेशनचे सहा. पोलीस निरीक्षक आशिष प. शेळके, पोहेकॉ आडकीत्ते, पोहेकॉ गावडे, पोकॉ पवार, पोकॉ क्षीरसागर, पोकॉ तमनर यांनी केली आहे.

# पोनि. फराटे, सपोनि. गोरे यांचा सत्कार

आधुनिक केसरी न्यूज

**सुधाकर जेठे**

**बाजार सावंगी :** निरीक्षकपदी नव्याने बदलून आलेले धनंजय फराटे व सहाय्यक निरीक्षकपदी दिनकर गोरे यांचे बाजार सावंगी पत्रकार संघटनेच्या वतीने पुष्पगुच्छ देऊन सत्कार करण्यात आला व शुभेच्छा दिल्या.

स्थानिक पत्रकारांच्या वतीने प्रशासकीय व सत्यावर आधारित पत्रकार म्हणून नेहमीप्रमाणेच सहकार्य आमचे राहील असे श्रीधर पाटील यांनी सांगितले. पोलीस प्रशासनही सदैव पत्रकारांना मार्गदर्शक वार्तापत्र देण्यास पुढाकार सहकार्य करेल. याप्रसंगी पत्रकार श्रीधर पाटील, सुधाकर जेठे, सचिन गवळी, विनोद नलावडे, यांची उपस्थिती होती.



# महामुनी जन्मोत्सवानिमित्त श्रीराम कथा ग्रंथराज ज्ञानेश्वरी पारायण सोहळा प्रारंभ

आधुनिक केसरी न्यूज

**बाबुराव गोनारकर**

**धर्माबाद :** येथील कैलास टेकडी कॉलेज रोड येथे महामुनी जन्मोत्सव निमित्त दि. 5 फेब्रुवारी 2024 रोज सोमवारी ग्रंथराज ज्ञानेश्वरी पारायण प्रारंभ झाला असून सकाळी 6:30 ते 9:30 ज्ञानेश्वरी पारायण, सकाळी 7:30 ते 9:30 होम हवन पुजा आरती,दुपारी 1:00 ते 4:00 श्रीराम कथा प्रवक्ते ह.भ.प. योगेश्वरी महाराज अग्रवाल वसमतकर यांच्या धार्मिक कार्यक्रमास प्रारंभ झाला. यात संगीत साथ श्री सागर महाराज आळंदी, तब्बला वादक श्री दिलीप महाजन साळवे आळंदीकर, गायक श्री दत्ता महाराज बोराडे संभाजीनगर आदी साथ देत आहेत.

श्रीराम कथा ग्रंथराज ज्ञानेश्वरी पारायण साठी धानोरा खु., येताळा, येवती ,सायखेड, जवळा बु.आलूर, पिंपळगाव, बाचेगाव ,बेल्लूर, जारीकोट, चिकना, जुनी, मंगनाळी, आतकुर, बाळापूर, रत्नाळी, येळवत, वाढवंण, तेलंगणासह तालुक्यातील भाविक भक्तांनी लाभ घ्यावा.

या सप्ताहातील दिः 5 फेब्रुवारी 2024 रोजी सोमवारी ग्रंथ महात्म्य, दि.6 फेब्रुवारी मंगळवारी शिवपार्वती संवाद सती कथा, शिव विवाह ,दि. 7 फेब्रुवारी रोजी बुधवारी राम जन्माच्या पाच कारणाचा विचार श्रीराम जन्म ,दि. 8 फेब्रुवारी रोजी गुरुवारी बाललीला नामकरण यज्ञोपवीत संस्कार विश्वमित्र यज्ञ ,दि. 9 फेब्रुवारी रोजी शुक्रवारी अहिल्या उद्धार- धनुष्य भंग- सीता स्वयंवर राम विवाह ,दि. 10 फेब्रुवारी रोजी शनिवारी वन गमन -केवट कथा- सीता हरण-शबरी उध्दार ,दि. 11 फेब्रुवारी रोजी रविवारी राम रावण युद्ध -रामराजेभिषेक असे नियमित कार्यक्रम प्रारंभ असुन दिः 12 फेब्रुवारी 2024 रोजी सोमवारी सकाळी 10:30 वाजता श्री. चिरंजीवी महर्षी मार्कंडेश्वर पालखी सोहळा भव्य मिरवणूक मार्कंडे मंदिरापासून हु. स्मारक, पानसरे चौक, नरेंद्र चौक ,नेहरू चौक, पोलीस ठाणे, नगरपरिषद मुख्य रस्त्यावर सोहळा संपन्न होणार आहे . तदनंतर महाप्रसाद सुरुवात होईल भाविकांनी लाभ घ्यावा असे आव्हान समस्त पद्मशाली समाजाच्या वतीने करण्यात आले.

# आव्हाडांचा पलटवार

आधुनिक केसरी

राज्याचे उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी शरद पवार यांच्यावर बारामती दौऱ्यात टीका केली होती. माझी शेवटची निवडणूक आहे, असे सांगितले जाऊन भावनिक केले जाईल, पण कधी शेवटची असणार काय माहित? असा टोला अजित पवार यांनी ज्येष्ठ नेते शरद पवार यांना लगावला होता. अजित पवार यांच्या या वक्तव्यावरून राज्याचे राजकारण तापल्याचे पहायला मिळते. अशातच आता याच विधानावरून शरद पवार गटाचे आमदार जितेंद्र आव्हाड यांनी अजित पवार यांच्या वक्तव्यावर आक्षेप नोंदवत सडकून टीका केली आहे. बारामतीत बोलताना अजित पवारांना हद्दच केली. एखाद्या व्यक्तीच्या मृत्यूची वाट बघणे, याचना करणे कितपत योग्य आहे? आपल्या चुलत्यांच्या मृत्यूची वाट पाहणे हे काय राजकारण आहे का? अजितदादा... असा सवाल जितेंद्र आव्हाड यांनी विचारला आहे. त्यांचे हे वक्तव्य माणुसकीला शोभणारे तरी आहे का? याचा विचार त्यांनी स्वत: करावा, असंही आव्हाड म्हणतात. बारामतीकर अशा माणसाला त्याची जागा दाखवतील. ते शरद पवार आहेत, त्यांचा शेवट नाही. ते महाराष्ट्राच्या राजकारणात अजरामर राहतील, असे म्हणत आव्हाड यांनी अजित पवार यांच्यावर तोफ डागली. आधी आपली उंची बघावी आणि शरद पवार कुठे आहेत अन् तुम्ही कुठे ते पाहावे. देशातील अटल बिहारी वाजपेयी, मनमोहन सिंग अशा मोठ्या व्यक्ती देखील शरद पवारांचे नाव काढतात. लाज वाटते मला तुमच्या सोबत काम केल्याची... असे म्हणत आव्हाडांनी संताप व्यक्त केलाय. ज्या कुटुंबाने तुम्हाला सर्व दिले, ज्या माऊलीने तुम्हाला सर्व दिले तीच कुंकू कधी पुसलं जाईल याची आज तुम्ही वाट बघता, असंही जितेंद्र आव्हाड यांनी म्हटलं आहे. दरम्यान, राष्ट्रवादीच नाही तर आता काँग्रेसने देखील अजित पवारांना पट्टीत घेते. काकांच्या भरोशावर जे मोठे झाले त्यांनी काकाला शिव्या घालत असतील तर तो त्यांचा प्रश्न आहे, असे नाना पटोले यांनी म्हटले आहे. राष्ट्रवादी पक्षात फूट पडल्याने संभ्रमित झालेल्या कार्यकर्त्यांना भावनिक विचार करू नये, असा सल्ला अजित पवार यांनी बारामतीत राष्ट्रवादी काँग्रेसच्या कार्यकत्यांना दिला आहे.

# सामाजिक संघर्ष राष्ट्रहिताला घातक..!

आधुनिक केसरी



प्रा.बरसमवाड विठ्ठल
गोकुळवाडी. ता. मुखेड

**सामाजिक, धार्मिक आणि वांशिक संघर्ष यातून निर्माण होणारा दहशतवाद हे भारतीय लोकशाही समोरील सर्वात मोठे आव्हान आहे, यामध्ये तेढ वाढल्यास संपूर्ण सामाजिक स्थैर्य नाहीसे होऊन लोक हवालदिल व बेचैन होतात आणि यामुळे राष्ट्रहिताला या गोष्टी बाधक ठरतात लोक गैरमार्गाचा वापर करतात, अल्पसंख्यांक असणारा समाज भयभीत होतो. एकमेकांवरील विश्वास राहत नाही. लोकांच्या मनात असमाधानाची भावना निर्माण होते या सर्व गोष्टी राष्ट्रहिताला घातक व बाधक ठरतात असे मला वाटते माणूस हा समूहात राहणारा प्राणी आहे.**

ज्यावेळेस समाजात प्रतिकूल परिस्थिती निर्माण होते, तेव्हा समाजातील वेगवेगळ्या घटका घटकांमध्ये सामाजिक संघर्ष उद्भवतात आणि त्याची परिणीती राष्ट्रहिताला बाधक ठरू शकते, म्हणून सामाजिक संघर्ष समोपचाराने मिटविलेले चांगले असतात. नाही तर सतत एकमेंकाविषयी असणारा सामाजिक द्वेष, सुडाने पेटून उठतो व तो वाईट कृत्याच्या पाठीमागे धावतो हे होऊ नये म्हणून हा लेखन प्रपंच......

वैदिक काळापासून समाजामध्ये चार वर्ण मानले गेले ते चार वर्ण एकमेकांच्या सोबतीने राहू लागले. काही लोक निरक्षर असल्यामुळे उच्चवर्णीयांची मक्तेदारी सांभाळून जीवन जगू लागले, व सेवा करत असत, नंतर काळ बदलत गेला. इंग्रजांनी भारतावर 150 वर्ष राज्य केले. त्यामुळे प्रत्येक जातीला आपले कार्य काय आहे? हे समजू लागले इंग्रजांनी भारतीय लोकांना कारकूनी शिक्षण दिले, त्यातून कारकून वर्ग तयार झाला आणि स्व चा अभिमान जागृत झाला, इतर समाज आपणास कमी लेखतात याची जाणीव होऊ लागली या देशासाठी प्रत्येकानी खारीचा वाटा उचलला, काहींनी देशासाठी बलिदान देऊन जीवन संपवले, तेव्हा आपल्या भारताला 15 ऑगस्ट 1947 ला स्वातंत्र्य मिळाले, देश सार्वभौमत्व झाला, आपले राष्ट्रगीत,गायले जाऊ लागले, चलन तयार झाले, तिरंगा झेंडा फडकू लागला, देशाला सर्वधर्मसमभावाचा दर्जा देण्यात आला प्रत्येक व्यक्ती जन्मताच स्वतंत्र आहे याची कल्पना देण्यात आली, आणि 26 जानेवारी 1950 रोजी आपला देश प्रजासत्ताक बनला, 1952 पासून देशात सार्वत्रिक निवडणुका सुरू झाल्या आणि तेव्हापासूनच देशातल्या देशात अंतर्गत हेवेदावे होऊ लागले. आणि पुढे भारतातील वेगवेगळ्या राज्यात सीमारेषेवरून वादंग निर्माण होऊ लागले, याचा परिणाम सामाजिक संघर्षात होऊ लागला, प्रत्येक समाजाला आपण इतरापेक्षा मोठे आहोत असे वाटू लागले,त्यातून जमातवाद, वसाहतवाद, दहशतवाद, सीमावाद, नक्षलवाद, उदयाला आला आणि त्याचे समाजावर विपरीत परिणाम होऊ लागले. आज गावात,शहरात समाजात लोक अनेक झेंडे घेऊन फिरताना दिसत आहेत. आपला झेंडा बघून लोक एकत्रित येत आहेत, इतर लोक बाजूला होत आहेत, त्यामुळे सामाजिक व राजकीय दरी निर्माण होत आहे

आपण शाळेत असताना फक्त आपणाला तिरंगा झेंडा एवढाच माहिती होता, केसरी रंग शौर्याचा पांढरा रंग शांततेचा आणि हिरवा रंग समृद्धीचा हे आपल्याला शाळेत शिकविले गेले ते आजही आम्ही अभिमानाने सांगतो आणि सांगतच राहणार आहोत,



पण आज परिस्थिती बदलली कोणता झेंडा हाती घेऊ असे म्हणायची वेळ आली आहे, त्यामुळे समाजानुसार झेंडे तयार झाले आहेत, अल्पसंख्याकांची घुसमट होत आहे, समाजात तेढ निर्माण झाल्यासारखे वातावरण तयार झाले. यामुळे राष्ट्रहिताला बाधा निर्माण होत आहे, प्रभूची लेकरे सारी हे गीत योग्य आहे की नाही याबद्दल आता विचार करावा लागेल. यापूर्वी अठरा आलूतेदार आणि बारा बलुतेदार मिळून सर्वांनी गुण्यागोविंदाने या भारतात जीवन जगत असताना झेंडे संस्कृती मध्येच उदयाला आली. बलसागर भारत होवो। विश्वात शोभूनी राहो असे अभिमानाने गीत गात होतो , सर्वजण आपले मित्र आहेत एकमेकांच्या ताटातून आपण जेवण करत होतो, त्यावेळेस सामाजिक एकात्मता खरोखरच चांगली होती, लोक निरक्षर असले तरी मनाने चांगले होते हा आपलाच आहे अशी भावना त्यांच्यावर होती. आता अलीकडच्या काळात लोक सुशिक्षित झाली आणि मनाने दूर झाली.एकमेकाबद्दल आपुलकी, माया, प्रेम, दया, ममता थोडी थोडी कमी होत आहे, हे सर्व अनुभवानी सांगता येते, परंतु सध्या जातीय संघर्ष पेटत आहेत.

त्यातून समाज भयभीत होत आहे, राष्ट्राची बांधणी सामाजिक एकात्मतेतून झालेली असते, हाताची पाच बोटं एकत्रित आली की वज्रमूठ तयार होते. एक बोट काहीही करू शकत नाही ,तसेच सर्व समाजाला घेऊन चालावे लागेल, त्यांच्या त्यांच्यात संघर्ष होणार नाहीत याची जबाबदारी घ्यावी लागेल. राष्ट्र, राष्ट्रवाद, स्वाभिमान प्रत्येक नागरिकात ठसठसून भरला पाहिजे. म्हणूनच आपण भारत माझा देश आहे. म्हणून आपण एकत्रित येतो.सर्व समाजातून लोक पुढे येतात. कोणी शेतकरी ,सैनिक, मंत्री ,शिक्षक व्यावसायिक, डॉक्टर, वकील ,सनदी अधिकारी, कवी ,लेखक, साहित्यिक, शास्त्रज्ञ अनेक समाजातून पुढे आलेले असतात, ते राष्ट्राची सेवा करतात म्हणून राष्ट्र हे बलशाली व कणखर होते .पण सामाजिक संघर्षामुळे घात होतो तो राष्ट्रहिताला अडसर ठरतो त्यामुळे व्यक्तीचे मने क्लुषीत होतात ते एकमेकाबद्दल तिरस्कार करतात. याचा फायदा आपले अप्रत्यक्ष असणारे शत्रू उठवतात, त्यातून राष्ट्राची हानी होते आपले राष्ट्र कमकुवत झाल्यानंतर इतर राष्ट्र आपल्या देशावर कधीही हल्ला करतील याचा नियम नसतो , फोडा आणि राज्य करा या नीतीचा ते अवलंब करतात म्हणून सर्वधर्मसमभावाने जातीय सलोखा ठेवून चालावे असे मला वाटते. जसे सर्व जाती धर्मातील संतांनी देश व समाज जोडण्याचे फार मोठे कार्य केले, त्यामुळे आपली सांप्रदायिकता संपूर्ण समाजाला एकत्रित करते,

विष्णुमय जग वैष्णवांचा धर्म ।।भेदाभेद भ्रम अमंगळ।।

असे त्यांनी म्हटले आहे,

साने गुरूजींनी खरा तो एकची धर्म म्हणून सर्वांना एकत्रित केले.

संत ज्ञानेश्वरांनी हे विश्वचि माझे घर असे म्हटले आहे। त्यातून एकात्मतेची भावना बळावते तुच्छता दूर पळून जाते, अंतःकरण एकत्रित येते, छत्रपती शिवाजी महाराजांनी अठरापगड जमातींना एकत्रित करून हिंदवी स्वराज्य निर्माण केले, छत्रपती संभाजी महाराजांनी या स्वराज्यासाठी आपले बलिदान दिले, हजारो क्रांतिकारकांना इंग्रजांनी फाशी दिली ते त्यांनी हसतमुखाने स्वीकारली ते फक्त या देशासाठी सर्व जण एकत्रित राहावे, संत गाडगे महाराजांनी सर्व समाजासाठी धर्मशाळा बांधल्या ,भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी सर्वांना समानतेचा संदेश दिला ,पुण्यश्लोक अहिल्याबाई होळकरांनी लाखो मंदिरांचा जीर्णोद्धार केला, जगद्गुरु संत तुकाराम महाराजांनी या रे या रे लहान थोर म्हणून सर्वांना एकत्रित केले,

परंतु आज समाजात एकमेंका विषयी तिरस्कार, द्वेष,सूड ,कपट निर्माण होत आहे , झेंडा संस्कृती उदयाला आल्यामुळे भविष्यात काय होईल? आता हे वारे कोणत्याही दिशेला वाहत आहेत, विकृती वाढली आहे, दिवसा ढवळ्या एकमेकांचे खून केले जात आहेत, दरोडे टाकले जात आहेत, बलात्कार, अत्याचार,चोरी या गोष्टी समाजात घडत आहेत, अनेक जणांच्या ठरवून हत्या केल्या जात आहेत, यामुळे समाज दुभंगला आहे सामाजिक स्वास्थ्य बिघडत आहे. धार्मिक संघर्ष निर्माण झाला तर लोकशाहीला धोका निर्माण होतो, आपले स्वातंत्र्य, समता ,बंधुता,आपली लोकशाही, आपली गाभाभूत घटके ,नैतिक,सामाजिक मूल्ये समाजात रुजली पाहिजेत तेव्हाच आपण एक आहोत, साखरेचा कण जसा दुधाशी एकरूप होतो, तसे व्यक्ती राष्ट्राशी एकरूप झाल्याशिवाय राष्ट्रबांधणी मजबूत होऊ शकत नाही. त्यामुळे सर्वांनी एकत्रित येऊन आपला देश मोठा करावा. महासत्ता होण्यासाठी राष्ट्रबळ वाढवण्यासाठी समाजामध्ये हेवेदावे, तेढ, द्वेष नाहीसे करावे लागतात ,आणि व्यक्ती हितापेक्षा राष्ट्रहिताला प्राधान्य द्यावे, तेव्हा सारे जहाँ से अच्छा। हिन्दोस्तॉ हमारा।। असे आपल्याला म्हणता येईल.

# नवोदय

आधुनिक केसरी



प्रा. डॉ. सतीश मस्के
संपर्क क्र. : 9423397484

**संध्याकाळची वेळ होती. साधारणत: आठ वाजले होते. विराट च्या घरचे सगळे टी.व्ही.पाहत पाहत जेवण करत बसले होते. विराटच्या भावाला म्हणजे जय ला पुरणपोळ्या आवडतात म्हणून त्याच्या आईने आज आमरस व पोळ्या केल्या होत्या. विराट चे पप्पा नंतर जेवण करतो म्हणून सोप्यावर काहीतरी लिहीत बसले होते. हे सारे जेवण करत असताना पप्पांना फोन आला. तो फोन विराटच्या शाळेमधून विराटच्या माधव सरांचा होता. पप्पांनी तो फोन उचलला व म्हणाले, " हॅलो, हॅलो..!' " मी विराटच्या शाळेमधून माधव सर बोलतो." " हा नमस्कार सर, बोला, बोला सर" "अहो, सर, तुमचा मुलगा विराट हा नवोदय विद्यालयाची परीक्षा पास झाला आहे."**

(मागील अंकावरून) सगळेजण तो परिसर पाहून भारावून गेले होते. आनंदी झाले होते. संध्याकाळी घरी परत येताना एका हॉटेलमध्ये गाडी थांबवून सगळ्यांनी जेवणं केली. दहाच्या दरम्यान घरी आले. घरी आल्यानंतरही पुन्हा तोच नवोदयचा विषय. विराट चे पप्पा त्यांच्या नवोदय विद्यालयात शिक्षक असणाऱ्या मित्रांना फोन करून नवोदय विद्यालयाविषयी माहिती विचारत होते. त्याचबरोबर जवळच्या नातेवाईकांनाही मुलगा नवोदय विद्यालयाची परीक्षा पास झाल्याचे सांगून त्यांनाही आपल्या आनंदात सहभागी करून घेत होते. बोलता बोलता विराटची वृत्तपत्रात बातमी देण्यासाठी लिहिली. दुसऱ्या दिवशी परीक्षा पास झालेले ची बातमी पेपरला दिली. पेपरला बातमी आल्यानंतर पेपरची बातमी काही मित्रांच्या व्हाट्सअप ग्रुप वर व फेसबुक वर टाकली. फेसबुक वर टाकल्यामुळे विराटच्या पप्पांना अनेक जणांचे अभिनंदनाचे फोन येऊ लागले. सर, तुमचा मुलगा फार हुशार आहे, तुम्ही लक्की आहात, तुमचे नशीब चांगले आहे. तिथे फार चांगले शिक्षण मिळते. तेथील मुले चांगले अधिकारी बनतात. असे सांगण्यात येऊ लागले. विराट चे पप्पाही शिक्षक असल्यामुळे त्यांना त्याविषयीची माहिती होतीच. परंतु अलीकडच्या काळात शिक्षणाविषयी वेगवेगळे बोलले जाऊ लागले असल्यामुळे त्यांच्या मनात वेगवेगळ्या प्रकारचे प्रश्न निर्माण होत होते. अनेक जण फोनवर पुन्हा पुन्हा सांगत होते की, सर, तुम्ही कसलाही विचार करू नका. बिनधास्त टाकून द्या. कारण बारावीपर्यंत शिक्षण तिथे फ्री आहे. कपडे, बूट चप्पल,दप्तर,पेन, पुस्तक,वही,अंथरून,पांघरून हे सारं सारं फ्री असणार आहे. तिथे जेवण पण चांगलं असतं. सकाळी लवकर उठणे, ग्राउंड वर जाणे, स्वतःची कामे स्वतः करून तयार होणे अशी चांगली शिस्त तिथे लावली जाते. शिवाय अभ्यासही चांगल्या रीतीने त्यांच्याकडून करून घेतला जातो. तिथला विद्यार्थी जगाच्या कानाकोपऱ्यात कुठेही आपलं एक स्वतःचं अस्तित्वं निर्माण करू शकतो. तिथे चांगल्या प्रकारचा घडविला जातो. सगळ्यांचं मत एकच येत होतं.अशा अनेक मित्रांचे फोन येत असल्यामुळे व विराटची ही जाण्यासाठीची खूप इच्छा असल्यामुळे विराटचे मम्मी, पप्पाही तयार झाले होते. तसा विराट हा मुळातच हुशार मुलगा होता. तो त्याच्या पहिल्या शाळेतही नावाजलेला विद्यार्थी होता. शिक्षक प्रिय विद्यार्थी म्हणून त्याला शाळेत गणले जायचे. तो स्वतःचा अभ्यास स्वतःच करत असायचा. त्याच्या घराशेजारीच त्याला शिकवणारे सर व मॅडम राहत असल्यामुळे त्याला त्यांच्याकडेच क्लास लावला होता. तू असाच अभ्यास केला पाहिजे, तुला तितकेच मार्क पडले पाहिजे असे घरी मात्र त्याला मम्मी किंवा पप्पा कडून कधीच दडपण आणले जात नसे. स्वतःहून स्वतःच्या मनानेच इयत्ता पाचवीच्या वर्गाचा व नवोदय विद्यालयाचाही अभ्यास करत असे. ॲमेझॉन वरून काही नवोदय विद्यालयाची पुस्तके मागवून घेतली होती. त्या पुस्तकातल्या प्रश्नपत्रिका सोडवून तो चांगला सराव करत असे. नवोदय विद्यालयाची परीक्षा आठ दिवसावर असतानाच विराटच्या आजीचं दुःखद निधन झालं. ते सगळेजण गावाकडे निघून गेले. विराटचे कुटुंब दुःखात बुडून गेलं होतं. विराटच्या आजीने विराटच्या पप्पाला घडवण्यासाठी खूप कष्ट उपसले होते. विराट ची आजी ही विराटच्या हुशारपणावर, देखणेपणावर खूप खुश असायची. तिला विराटचे खूप खूप कौतुक वाटायचे. एकदा तर त्याला काळ्या रंगाचा शर्ट घेण्यासाठी तिने पैसे दिले होते. त्यामुळे विराटच्या मनातही आजी विषयीच्या काही आठवणी होत्या. **क्रमश :**

हे पत्र संपादक, मालक, मुद्रक व प्रकाशक डॉ. प्रभू व्यंकटराव गोरे* यांनी सोलापूर तरुण भारत मीडिया लि., प्लॉट नं ए -३२, छत्रपती संभाजीनगर इंडस्ट्रीयल को-ऑप., सोसायटी, स्टेशन रोड, छत्रपती संभाजीनगर ४३१ ००५ (महाराष्ट्र) येथे मुद्रित करून प्लॉट नं. २०५, १३ वी योजना, जिजामाता कॉलनी, एन - २, सिडको, जि. छत्रपती संभाजीनगर (महाराष्ट्र) येथून प्रकाशित केले. (* पीआरबी कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांची आहे. या अंकात प्रसिद्ध झालेल्या प्रत्येक बातमी, लेख व जाहिरातींशी संपादक सहमत असतीलच असे नाही. सर्व वाद छत्रपती संभाजीनगर न्यायालयाच्या कक्षेत) आरएनआय : एमएएचएमएआर/२०२१/८२५६६, ई-मेल : aadhunikkesari@gmail.com, संपर्क : +९१ ९०७५७ १६७३९

Printed at Solapur Tarun Bharat Media Ltd., Plot No. A-32, Chhatrapati Sambhajinagar Industrial Co-op, Society, Station Road, Chhatrapati Sambhajinagar 431005 (Maharashtra) Plot No. 205, 13th Plan, Jijamata Colony, N - 2, CIDCO, Dist. Chhatrapati Sambhajinagar (Maharashtra) and published by editor, owner, printer, and publisher Dr. Prabhu Venkatrao Gore * (* According to the PRB Act, it is the responsibility of the editor. The editor does not necessarily agree with every news, article, and advertisement published in this issue. All disputes are within the purview of the Chhatrapati Sambhajinagar court.) RNI : MAHMAR/2021/82566, E-mail: aadhunikkesari@gmail.com, Contact : +91 90757 16739

# श्रीक्षेत्र राजुर येथे अखंड हरिनाम सप्ताहास प्रारंभ

## आ. कुचे यांच्या हस्ते उद्घाटन : परमपूज्य खडेश्वरी बाबा, गणेशदेवा महाराज यांच्या हस्ते ग्रंथ व कलश पूजन

आधुनिक केसरी न्यूज

**प्रा. बाळासाहेब बोराडे**
**श्रीक्षेत्र राजुर :** येथे श्री गणेश जयंती जन्मोत्सवनिमित्त राजुरेश्वराच्या पायथ्याशी सहा फेब्रुवारी पासून अखंड हरिनाम सप्ताहास प्रारंभ झाला असून आमदार नारायण कुचे यांच्या हस्ते दीपप्रज्वलन करून अखंड हरिनाम सप्ताहाचे उद्घाटन करण्यात आले. शिवशक्ती आश्रमाचे परमपूज्य खडेश्वरी बाबा व पाचीपर दत्त संस्थांचे गणेशदेवा महाराज,हभप विष्णू महाराज सास्ते यांच्या हस्ते ग्रंथ व कलश पूजन करण्यात आले. गणपती संस्थान अध्यक्ष तथा तहसीलदार संतोष बनकर,सहायक पोलीस निरीक्षक संजय अहिरे, सरपंच प्रतिभा भुजंग यांच्या हस्ते टाळ व विना पूजन करण्यात आले.
याप्रसंगी व्यासपीठावर विविध क्षेत्रातील मान्यवर उपस्थित होते.सप्ताह दरम्यान विविध धार्मिक कार्यक्रम आयोजन करण्यात आले असून परिसरातील भाविकांनी याचा लाभ घ्यावा असे आवाहन सप्ताह उत्सव समितीच्या वतीने करण्यात आले आहे. यावेळी गणपती संस्थान व्यवस्थापक प्रशांत दानवे, माजी जि.प.सदस्य कैलास पुंगळे, रामेश्वर सोनुने, माजी सभापती गजानन नागवे, सहकार बोर्डाचे अध्यक्ष बाबुराव खरात, जेष्ठ पत्रकार श्यामराव पुंगळे, विश्वस्त गणेशराव साबळे, नारायण पुंगळे, आण्णासाहेब भालेराव, तंटामुक्ती अध्यक्ष श्रीरामपंच पुंगळे, उपसरपंच संतोष मगरे,ग्राम पंचायत सदस्य विनोद डवले, व्यापारी संघाचे अध्यक्ष सारंगधर बोडखे,उपाध्यक्ष सुखानंद पारवे,सचिव रामेश्वर काढवणे,ग्रामविकास अधिकारी प्रमोद पुंगळे, सरपंच निवृत्ती शेवाळे,रुद्राणी फाऊंडेशन अध्यक्ष भीमाशंकर दारुवाले,मेस्टा जिल्हाध्यक्ष ज्ञानेश्वर पुंगळे, जगनराव पवार,संतुकराव पुंगळे,बाळू मापारी,मुकेश अग्रवाल तसेच ग्रामस्थ व भावीक मोठ्या संख्येने उपस्थित होते.




**संत संस्कारातून वारकरी संप्रदाय वाढला :**
राजूर येथे गेल्या 57 वर्षापासून हरिनामाची अखंड सेवा चालू आहे .जोग महाराजांनी वारकरी संप्रदायाची पताका हाती घेऊन मुहूर्तमेढ रोवली .महाराष्ट्र ही संतांची भूमी आहे . संत संस्कारातून वारकरी संप्रदाय वाढला .आज श्रीक्षेत्र राजुरला जे वैभव प्राप्त झाले आहे त्यात केंद्रीय मंत्री रावसाहेब पाटील दानवेंचे फार मोठे योगदान आहे .
**-आ .नारायण कुचे**

संस्कृती टिकली तरच देश टिकेल :राष्ट्रवादासाठी युवकांवर योग्य संस्कार होणे गरजेचे आहे . अध्यात्मातून हे संस्कार मिळतात .संस्कृती टिकली तरच देश टिकेल . कुविचारांची आहुती सदविचारांची जोपासना व्हायला हवी . संस्कार टिकवण्यासाठी वारकरी संप्रदाय महत्वाचा आहे .
**- परमपूज्य खडेश्वरी बाबा**

# मद्यपी शिक्षकाची पालकांकडून पोलखोल

आधुनिक केसरी न्यूज

**राहुल त्रिभुवन**
**वैजापूर :** तालुक्यातील शिवूर केंद्रातर्गत येणाऱ्या बागायतदार वस्ती येथील जिल्हा परिषद प्राथमिक शाळेचे मद्यपी शिक्षक देशमुख यांची येथील पालकांनी पोलखोल केल्याचा व्हिडिओ व्हायरल झाला असून पालकांचा रोष याप्रसंगी बघावंयास मिळत आहे. दारू पिऊन वर्गात अध्यापनाचे कार्य करणाऱ्या "मध्यपि" शिक्षकांची पालकांनी पोलखोल केली असून घटनेची माहिती मिळताच काही संघटनेच्या पदाधिकाऱ्यांसह, शिक्षणधिकारी आदींनी या ठिकाणी धाव घेतली आहे.काही पालकांच्या तक्रारीनुसार संबधित घटनेची सखोल चौकशी करून पुढील कारवाही होणार असल्याचे गटशिक्षणाधिकारी यांनी सांगितले आहे.



# मंडळाधिकारी प्रकाश सुर्वेची धडक कारवाई

आधुनिक केसरी न्यूज

**बल्लारपूर :** तहसीलमध्ये गोंडपिपरी वरुन आलेले मंडळ अधकारी येथिल चार्ज घेताच तालुक्यातील रेती. मुरुम खनीज संपती अवैध तस्करावर धडक कारवाई करण्यात आली व लाखो रुपयांची महसूल जप्ती कारवाही करुन ट्रक, ट्रॅक्टर वर दंड आकारून शासन जमा करण्यात आले दि.5 फरवरी रोजी सायंकाळी चा सुमारास खबरी द्वारे महिती मिळाली की आक्सापुर हून रेती ने भरलेली ह्यावा ट्रक जा करीत असते. अशी माहिती असताना बल्लारपूर तालुक्यातील मंडळ अधिकारी प्रकाश सुर्वे व कोठारी चे मंडळ अधिकारी सुजीत चौधरी यांनी आमडी गावाजवळ दोन हयवा ट्रक ला अडकून माहिती घेतली असता कागदपत्रे (टीपी) बरोबर नसल्याने दोन्हीं हायवा ट्रक क्र MH -34-BG-1627 MH व MH -BZ -0221 तहसील कार्यालयात जमा करण्यात आले. हे ट्रक कोरपना येथील सदाम यांचे मालकीचे असल्याचे समजले बल्लारपूर तालुक्यातील रेती तस्कर मध्ये मंडळ अधिकारी च्या कारवाही मूळे दहशत निर्माण झाली आहे.

# विवाहितेच्या मृत्यूस कारणीभूत सासरच्या मंडळी विरोधात गुन्हा

आधुनिक केसरी न्यूज

**निफाड :** रुई, ता.निफाड येथील माहेर व कोळवाडी ता.निफाड येथील सासर असलेल्या विवाहितेस सासरच्या मंडळींनी मारहाण करून विहिरीत फेकले. मात्र दीड महिन्यापासून उपचार घेत असलेल्या महिलेने अखेरचा श्वास



घेतल्याने सासरच्या मंडळी विरोधात निफाड पोलीस ठाण्यात खुनाचा गुन्हा दाखल करण्यात आला आहे.
मयत दिपालीचे वडील अशोक बाळकृष्ण तासकर (वय ६१) रुई ता. निफाड यांनी दिलेल्या फिर्यादीत, आरोपी भारत विलास पापळ, विलास सटवाजी पापळ, दत्तात्रय विलास पापळ सर्व रा.कोळवाडी यांनी संगनमत करुन फिर्यादीची मुलगी दिपाली भारत पापळ वय ३० वर्षे रा. कोळवाडी हिस तिच्या आईवडीलांकडुन वेळोवेळी पैशाची मागणी करुन तीस शिवीगाळ, दमदाटी, मारहाण करुन उपाशी पोटी ठेवत असत. त्यांना प्रियंका (वय ७) सार्थक (वय ६) असे दोन अपत्य असून भारतला दारूचे व्यसन होते. त्यामुळे तो वेळोवेळी पैशाची मागणी करत असे. दिवाळीपूर्वी पैशासाठी त्यांनी तीला माहेरी काढून दिले होते. त्यांना वेळोवेळी दीड लाखाच्या आसपास पैसेही दिले मात्र, ननंद आशा व अनिता माहेरी आल्यावर त्यांच्या सांगण्यावरून तो तिला मारहाण करत असे. मयत दिपाली हिस दि.२८ डिसेंबर २०२३ रोजी रात्री ८ वाजेचे सुमारास नवरा- भारत विलास पापळ, सासरा - विलास सटवाजी पापळ, सासु- मंदाबाई विलास पापळ, दिर- दत्तात्रय विलास पापळ सर्व रा. कोळवाडी यांनी कोळवाडी गावी तिचे राहते घरी काठीने, हाता - बुक्यानी मारहाण करुन त्यांचे शेतातील घराजवळील विहीरीत टाकुन दिले होते. त्यांनतर तिला निफाड येथील खाजगी व त्यानंतर नाशिक येथील खाजगी रुग्णालयात दाखल करण्यात आले होते. तेव्हा मुलगी दिपाली ही बेशुध्द अवस्थेत होती. तिचे अंगावर मारहाणीच्या खुणा होत्या. त्यामुळेच मुलगी दिपाली ही दि.५ फेब्रुवारी २०२४ रोजी मयत झालेली आहे असे फिर्यादीत म्हटले आहे. त्यांचे फिर्यादीवरून भारत विलास पापळ, विलास सटवाजी पापळ, सासु- मंजाबाई विलास पापळ, दिर - दत्तात्रय विलास पापळ, ननंद आशाताई नंदू शिंदे रा. चांदोरी, अनिता धनंजय जगताप रा. सोमठाणे यांचे विरुद्द निफाड पोलीस ठाण्यात गु.र.नं. ४१/२०२४ भा.द.वि.क.३०२, ४९८ (अ), ३२३, ५०४, ५०६, ३४ प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला आहे. अधिक तपास स.पो.नि.पाटील अधिक तपास करीत आहेत.
दरम्यान आज दुपारी मयत दिपाली वर प्रचंड तणाव पूर्ण वातावरणात कोळवाडी येथे तिच्या घरासमोर अंत्यसंस्कार करण्यात आले. याप्रसंगी पोलीस उपविभागीय अधिकारी डॉ.निलेश पालवे यांच्या मार्गदर्शनाखाली राज्य राखीव दलाच्या चार तुकड्या, लासलगाव, निफाड पोलिसांनी चोख बंदोबस्त ठेवला.

# स. भु. प्रशालेत १२ वीच्या विद्यार्थ्यांचा निरोप

आधुनिक केसरी न्यूज

**फुलंब्री :** तालुक्यातील वडोद बाजार श्री स. भु. प्रशाला वडोद बाजार येथे इ.१२ वी(कला व विज्ञान) शाखेतील विद्यार्थ्यांना प्रशालेच्या उच्च माध्य. विभागातर्फे निरोप देण्यात आला. कार्यक्रमाचे अध्यक्ष शालेय समितीचे अध्यक्ष श्री डॉ. गोपाळराव पा. वाघ हे होते. तर कार्यक्रमाचे प्रमुख प्रशालेचे मुख्याध्यापक तथा प्राचार्य श्री गणेशसिंग गौर व विद्यार्थीनी उज्वला रमेश दणके, या मान्यवरांच्या हस्ते दीप प्रज्वलन करण्यात आले व श्री सरस्वतीच्या प्रतिमेचे पूजन करून, पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले. यावेळी व्यासपीठावर प्रशालेचे पर्यवेक्षक श्री एस जी गायकवाड, उ मा वि प्रमुख श्रीमती ममाले बी सी, श्री होसुरकर एस डी, श्री खेडकर एस के , श्री आर एस भाले , श्री व्ही बी पाटील , श्री ए व्ही तांदळे ,श्री बी सी पाटील प्रशालेचे वरिष्ठ लिपिक श्री काथार सर हजर होते.कार्यक्रमाचे प्रास्ताविक यामध्ये श्री बी सी पाटील यांनी २०२३-२४ मध्ये होणाऱ्या इ. १२ वी चे परीक्षेचे स्वरूप कसे असेल, विद्यार्थ्यांनी कोणती काळजी घ्यावी, याबद्दल विद्यार्थ्यांना सखोल मार्गदर्शन केले. मा विभागीय सचिव व मा शिक्षणाधिकारी (माध्य.)जि प औरंगाबाद यांनी HSC/SSC FEB/MARCH-2024 मध्ये होणाऱ्या लेखी परीक्षा संबंधीच्या सूचना तसेच शिक्षा सूची मधील 32 मुद्दे व त्याबाबत देण्यात येणारी शिक्षा सूची याविषयीचे प्रकट वाचन उच्च माध्य. विभागाचे केंद्र संचालक श्री होसुरकर एस डी यांनी प्रकट वाचन करून परीक्षेसंबंधी सूचना व गैरप्रकाराविषयीच्या कोणत्या शिक्षा ,शिक्षा सूची मध्ये नमूद करण्यात आलेल्या आहेत त्याविषयी विद्यार्थ्यांना अवगत करून विद्यार्थ्यांमध्ये जागरूकता निर्माण केली .
त्यानंतर आपल्या मनातल्या भावना, विचार, शिक्षकांनी दिलेली शिदोरी अशा एक ना नानाविध तुंबलेल्या विचारांना मोकळी वाट करून इ.१२ वी तील अनेक विद्यार्थी, विद्यार्थिनींनी आपली मनोगते व्यक्त केली. यावेळी विद्यार्थ्यांनी थोर समाज सुधारक यांचे फोटो व भेटवस्तू प्रशालेला भेट देऊन त्यांचे अनावरण प्रमुख मान्यवरांच्या हस्ते करण्यात आले. प्रशालेचे पर्यवेक्षक श्री एस जी गायकवाड, श्री एस के खेडकर, श्री आर एस भाले, श्री व्ही बी पाटील, श्री ए व्ही तांदळे,श्रीमती जाधव एल के, यांनी आपले मनोगत व्यक्त करून विद्यार्थ्यांना परीक्षेसाठी शुभेच्छा दिल्या.
कार्यक्रमाचे प्रमुख प्रशालेचे मुख्याध्यापक तथा प्राचार्य श्री गणेशसिंग गौर सर यांनी विद्यार्थ्यांना परीक्षेविषयी मार्गदर्शन करताना सांगितले की, विद्यार्थ्यांनी कोणताही तणाव अंगी न बाळगता, हसत मुखाने परीक्षेस सामोरे जावे. निरोप म्हणजे हा आजचा शेवट व महाविद्यालयीन शिक्षणासाठीची सुरुवात असते, तसेच ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांनी मनात न्यूनगंड न आणता यशाची शिखरे गाठावीत असा ही सल्ला त्यांनी विद्यार्थ्यांना दिला. या शैक्षणिक वर्षात मा शिक्षण उपसंचालक व मा शिक्षणाधिकारी यांनी लेखी सराव परीक्षा घेतलेल्या असल्यामुळे विद्यार्थ्यांच्या चाचणी व सराव परीक्षा मुळे लिखाणाचा चांगला सराव झालेला आहे.






# वावना गावात आरोग्य सेवेचा बोजवारा ?

## आरोग्य उपकेंद्राला ग्रामस्थांनी लावले कुलूप !

आधुनिक केसरी न्यूज

**फुलंब्री :** प्राथमिक आरोग्य केंद्र बाबरा अंतर्गत वावना ता फुलंब्री जि छत्रपती संभाजीनगर येथील आरोग्य उपकेंद्रात आरोग्य सेवेचा बोजवारा उडाला असून इथे सेवा देणारेच गैर हजर व बेजबाबदार वर्तन करतात यामुळे उपकेंद्राला ग्रामस्थानी कुलुप ठोकले आहे . वरिष्ठांनी तात्काळ दखल घेऊन कारवाई करावी अशी मागणी केली जात आहे . फुलंब्री तालुक्यातील वावना येथील सामुदाईक आरोग्य अधिकारी डॉक्टर श्रीमती सिमा हाके यांनी या उपकेंद्रात सकाळी ८:३० ते दुपारी १२:३० या वेळेत ओपीडी करत रुग्ण सेवा देणे गरजेचे असतांना त्या कधीही वेळेवर हजर राहत नाही. वावना ग्रामपंचायतने सदर महिला डॉक्टरांना आरोग्य सेवा देण्या बाबत वारंवार विनंती केली असता ग्रामपंचायत व गावाकऱ्यांना न जुमनाता आपली हुकुमशाही सोडायला त्या तयार नाही .यामुळे नागरिकांची दुरवस्था होत आहे प्राथमिक आरोग्य केंद्र बाबरा येथील वैद्यकीय अधिकारी यांना सुद्धा आरोग्य सेवा सुरळीत देण्या बाबत ग्रामस्थांनी अनेक वेळा विनंती केली असता त्यांचेही ऐकायला त्या मॅडम तयार नाही. त्यामुळे सामुदाईक आरोग्य अधिकारी श्रीमती सिमा हाके मॅडम हया ११ वाजेनंतर उपकेंद्रात आल्याने त्यांच्या या हलगर्जीपणामुळे ५ फेब्रुवारी त्याच्या समक्ष आरोग्य उपकेंद्राला कुलूप लावण्यात आले .यावेळी सरपंच सौं भागुबाई कैलास काकडे, मा सरपंच कैलास काकडे, उपसरपंच दामोधर जाधव.सोसायटी चेअरमन योगेश जाधव सामाजिक कार्यकर्ते किसनराव जाधव , भिकन जाधव, अतुल जाधव, योगेश सिरस्कर, गणेश सोनवणे, ग्रामपंचायत कर्मचारी दिगंबर जाधव, रामदास जाधव, उपस्थित होते.



# शिक्षकाचा प्रताप; शाळेत घेत होता दारू



आधुनिक केसरी न्यूज

**राहुल त्रिभुवन**

**वैजापूर :** तालुक्यातील शिवूर केंद्रातर्गत येणाऱ्या बागायतदार वस्ती येथील जिल्हा परिषद प्राथमिक शाळेचे मद्यपी शिक्षक देशमुख यांची येथील पालकांनी पोलखोल केल्याचा व्हिडिओ व्हायरल झाला असून पालकांचा रोष याप्रसंगी बघावयास मिळाला आहे. ही घटना वैजापूर तालुक्यातील शिवूर केंद्रातर्गत येणाऱ्या बागायतदार वस्ती येथील जिल्हा परिषदेच्या प्राथमिक शाळेत घडली असून दारू पिऊन वर्गात अध्यापनाचे कार्य करणाऱ्या "मध्यपि" शिक्षकांची पालकांनी पोलखोल केली आहे. याप्रसंगी घटनेची माहिती मिळताच काही संघटनेच्या पदाधिकाऱ्यांसह,केंद्रप्रमुख सह आदींनी या ठिकाणी धाव घेतली आहे.याप्रकरणी आमचे प्रतिनिधी यांनी गटशिक्षणाधिकारी अधिकारी हेमंत उशीर यांच्याशी संपर्क साधला असता काही पालकांच्या तक्रारीचे कॉल मला प्राप्त झाल्यानंतर मी केंद्रप्रमुख यांना कळविले असून त्यांचा अहवाल प्राप्त झाल्यानंतर पुढील कृती करण्यात येईल अशी माहिती प्रतिनिधीशी बोलताना त्यांनी दिली. यामुळे पालक व इतर नागरिकांत संबधित शिक्षकाविरुद्ध नाराजीचा सुर निघत रोष बघावयास व्हायरल व्हिडिओत मिळत आहे.

# सावकाराच्या जाचास कंटाळून घेतला गळफास

आधुनिक केसरी न्यूज

**बुलढाणा :** सावकाराचा जाच असह्य झाल्याने एका वृद्ध शेतकऱ्याने आत्महत्या केली. मृत्यूपूर्वी त्याने पोलिसांच्या नावाने 'मृत्यूपत्र' लिहिले असून मनगटावर सावकाराचे नाव लिहिले आहे. मेहकर तालुक्यातील उकळी येथे आज मंगळवारी ही धक्कादायक बाब उघड झाली. यामुळे मेहकर तालुक्यासह कृषिप्रधान बुलढाणा जिल्हा हादरला आहे. उद्धव परसराम मानवतकर (६०, रा. उकळी) असे टोकाचे पाऊल उचलणाऱ्या शेतकऱ्याचे नाव आहे. अल्पभूधारक शेतकरी असलेल्या उध्दव मानवतकर यांनी दोन चिठ्ठ्या लिहून ठेवल्या आहेत. मेहकर येथील सुनील तिफने पाटील, त्यांचा पुतण्या आणि मुलगा अमर सुनील तिफने यांनी आत्महत्या करण्यास प्रवृत्त केल्याचे शेतकरी उद्धव मानवतकर यांनी 'मृत्युपत्र'मध्ये नमूद केले आहे. त्यातील मजकुरानुसार त्यांनी २८ ऑक्टोबर २०२२ रोजी सावकार सुनील तिफने यांच्याकडून २० हजार रुपये घेतले होते. त्यातील १० हजार रुपये परत केले असतानाही तिफने पाटील यांनी ८० हजार रुपये मागितल्याचे शेतकऱ्याने पत्रात लिहिले आहे. मानवतकर याने तुम्ही काय भावाने व्याज लावले अशी विचारणा केली असता "तू घरी ये हिशोब सांगतो" असे सावकाराने म्हटले होते.



# दत्ता गोर्डेंची शिवसेनेत घरवापसी

## उद्धव ठाकरे यांच्या हस्ते बांधले शिवबंधन

आधुनिक केसरी न्यूज

**दादासाहेब घोडके**

**पैठण :** तालुक्यातील आक्रमक शिवसेना कार्यकर्ते आणि नंतर पक्षांतर करणारे दत्ता गोर्डे पुन्हा एकदा उद्धव ठाकरे यांच्यासोबत शिवबंधन बांधले आहे.

दत्ता गोर्डे यांनी आपल्या शेकडो कार्यकर्ते सह शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे सेनेत प्रवेश केला विरोधी पक्षनेते श्री अंबादास दानवे साहेब यांच्या उपस्थितीत शिवसेना प्रमुख श्री उध्दव बाळासाहेब ठाकरे यांनी शिवबंधन बांधुन प्रवेश दिला यावेळी अशोक पटवर्धन (मराठवाडा सचिव) विनोद घोसाळकर (संपर्क प्रमुख) जिल्हा प्रमुख राजेंद्र राठोड उपजिल्हा प्रमुख अंकुश रंधे , अशोक शिंदे, बद्रीनारायण भुमरे, पैठण तालुका विधानसभा प्रमुख, शिवसेना तालुका प्रमुख मनोज पेरे, औरंगाबाद तालुका प्रमुख आनंद भालेकर, शुभम पिवळ (युवा जिल्हा प्रमुख ) सोमनाथ जाधव (जिल्हा संघटक) विकास गोर्डे, युवा तालुका प्रमुख अजय परळकर, पैठण शरह प्रमुख सह शेकडो कार्यकर्ते उपस्थित होते. पांडुरंग थोटे , सुरेश दुबाले, गोपिनाना गोर्डे, आप्पासाहेब गायकवाड, निवृत्ती बोबडे, राजुमामा बोबडे, वामनदादा साठे, प्रकाश बनसोडे ,शेख सलीम, सतीश पल्लोड, अतिश गायकवाड, अस्लम पठाण, इस्माईल नगरकर, बद्रीनाथ गोर्डे ,अरेफ शेख, मनावर शेख, नितीन गिधाने, सुनील त्रिभुवन, कैलास कळसकर, प्रविण शिंदे, अशोक नाना औटे, संदीप हनुमते ,शिवाजीराव लांडगे, संजय सदावर्ते ,आशुतोष नरवडे, अमोल घनवट ,श्रीराम नागेश घोरपडे, रियाज पटेल, भगवान कबड्डी, काका गोरे, सचिन राजपूत ,संभाजी अत्रे, कय्युम पठाण ,विष्णुपंत नलावडे, सदाशिव गोरडे, समीर पटेल, अनिस पटेल, संजय लंभाडे ,अतिक अवघड ,निसार पठाण,नसीब पठाण ,शेख हाजी, शिवाजी लांडगे, माऊली घोरपडे, शिवराज चौधरी, प्रणय शिंदे ,शुभम गायकवाड, यांनी प्रवेश केला.

# वडोद बाजार येथे कामगारांना पेटी वाटप

आधुनिक केसरी न्यूज

**वडोद बाजार :** वडोद बाजार येथे बांधकाम कामगारांना पेट्या वाटप करण्यात आल्या. यावेळी वउपसरपंच गोपाळ वाघ, सोसायटी चेअरमन कडूबा मस्के, प्रफुल शिंदे, काकाजी कोलते, कामगार संघटनेचे जिल्हा उपाध्यक्ष ताजामात शहा, बाबूराव मंदाडे, राजू पांढरे, जनार्दन शिंगारे, मिर्झा बेग, अहमद शेख, गजानन काथार, गोविंद पांडेजी, अंजुम शेख, रमेश वाघ, अशोक शिनगारे, अहमद शहा ,रईस शहा मोहसीन, शहा, अनिस शहा, मुख्तार शहा, शफिक शहा, ज्ञानेश्वर ब्रहामने, शेख इसुब, शेख अबेद सुरेंद्र कोलते, शेख रईस आदी स ह ग्रामास्थ उपस्थित होते. जिल्हा महासंघ कामगार मंडळ च्या सदस्यपदी तजामत शहा यांची निवड करण्यात आली त्यांच्या निवडीबद्दल त्यांचा सत्कार करण्यात आला.



# जिल्हा परिषद प्राथमिक शाळा आडगाव बु. येथे वार्षिक स्नेहसंमेलन उत्साहात साजरे

आधुनिक केसरी न्यूज

**फुलंब्री :** तालुक्यातील निधोना आडगाव बुद्रुक केंद्र जिल्हा परिषद शाळा जि.प.प्रा.शा. आडगाव बु. केंद्र- निधोना या शाळेने शैक्षणीक वर्ष 2023-24 मधील वार्षिक स्नेह संमेलनाचे आयोजन करण्यात आले होते. सदर कार्यक्रमासाठी प्रमुख पाहुणे म्हणून निधोना केंद्राचे केंद्र प्रमुख मा. श्री चंद्रकांत मुगले आणि केंद्रीय मुख्याध्यापक मा. श्री काकासाहेब नलावडे लाभले होते. या कार्यक्रमाप्रसंगी गावचे सरपंच श्रीमती पार्वताबाई चव्हाण, उपसरपंच श्री. विलास खोतकर, माजी उपसरपंच भाऊसाहेब धोंडकर तसेच शा.व्य.स अध्यक्ष संदीप मगर आणि शाळेचे मुख्याध्यापक श्री वाघमारे सर यांनी छत्रपती शिवाजी महाराज आणि सावित्रीबाई फुले यांच्या प्रतिमेचे पूजन करून सांस्कृतीक कार्यक्रमाचे उद्घाटन करण्यात आले.यानंतर उपस्थित पाहुण्यांचे व पदाधिकारी यांचे शाळेच्या वतीने स्वागत करण्यात आले. यानंतर कार्यक्रमाचे प्रास्ताविक करून जल्लोष 2024 या रंगारंग सांस्कृतिक संध्या या कार्यक्रमाला सुरुवात करण्यात आली. या कार्यक्रमासाठी इयत्ता पहिली ते आठवी मधील विद्यार्थ्यांनी विविध गीतांवर आपल्या नृत्यांचे सादरीकरण करण्यात आले. विद्यार्थ्यांच्या उत्कृष्ट आणि बहारदार सादरीकरणाला पाहून उपस्थित ग्रामस्थांनी बक्षिसांच्या स्वरूपात प्रचंड प्रतिसाद देऊन साद दिली. या कार्यक्रमासाठी छत्रपती संभाजीनगर आणि खुलताबाद तालुक्यातील शिक्षकांची विशेष उपस्थिती होती. या कार्यक्रमासाठी गावातील सर्वश्री गावचे पत्रकार शुभम जगताप, रावसाहेब धोंडकर अंकुश जगताप यांनी भरीव सहकार्य केले. हा कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी शाळेचे शिक्षक श्री चिकणे सर, श्री धोत्रे सर, श्रीमती सिंघल मॅडम आणि श्रीमती साळवे मॅडम यांनी विशेष परिश्रम घेतले. हा कार्यक्रम पाहण्यासाठी शाळा व्यवस्थापन समिती अध्यक्ष, उपाध्यक्ष , सदस्य,उपाध्यक्ष, सर्व ग्रामपंचायत सदस्य,सोसायटी



चेअरमन, सदस्य, अंगणवाडी कार्यकर्त्या, मदतनीस, विद्यार्थी पालक,माजी विद्यार्थी, ज्येष्ठ नागरिक, प्रतिष्ठित नागरिक,व आडगावचे नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन शाळेचे शिक्षक श्री गजानन धोत्रे सर यांनी केले तर कार्यक्रमाचे आभार प्रदर्शन शाळेचे मुख्याध्यापक श्री प्रकाश वाघमारे सर यांनी केले. शेवटी सामूहिक नृत्याने कार्यक्रमाची चैतन्यपूर्ण सांगता करण्यात आली.

# प्रखर राष्ट्रवादाचा सर्वोच्च सन्मान : केंद्रीय रेल्वेमंत्री रावसाहेब दानवेंच्या आगळ्यावेगळ्या शुभेच्छा

## माजी उपपंतप्रधान लालकृष्ण आडवाणींसोबतचा फोटो शेअर करून आठवणींना दिला उजाळा

आधुनिक केसरी न्यूज

**जालना :** देशाचे माजी उपपंतप्रधान व भाजपचे जेष्ठ नेते लालकृष्ण अडवाणी यांना भारतरत्न हा सर्वोच्च नागरी पुरस्कार जाहीर झाल्याबद्दल देशभरातून अभिनंदनाचा वर्षाव होत आहे.याच पार्श्वभूमीवर केंद्रीय रेल्वेमंत्री रावसाहेब पाटील दानवे यांनी आगळ्यावेगळ्या शुभेच्छा दिल्या आहेत. केंद्रीय रेल्वेमंत्री दानवेंनी ज्येष्ठ नेते लालकृष्ण अडवाणी यांच्या सोबतचा एक जुना फोटो शेअर करून आठवणींना उजाळा दिला आहे. फोटोच्या माध्यमातून भावनिक साद घालत माननीय अडवाणी यांचे अभिनंदन करून पंतप्रधान नरेंद्र मोदींचे आभार मानले आहे. केंद्रीय रेल्वेमंत्री ना.रावसाहेब दानवेंनी माननीय अडवाणी यांना शुभेच्छा देतांना म्हटले आहे की भाजपचे ज्येष्ठ नेते आणि आमचे मार्गदर्शक आदरणीय श्री लालकृष्ण अडवाणी यांना भारतरत्न हा सर्वोच्च सन्मान देण्याची घोषणा आमच्यासाठी खूप आनंददायी आणि भावनिक आहे. पुढे शुभेच्छा देतांना केंद्रीय मंत्री ना.दानवें म्हणाले की भारताच्या विकासात लालकृष्ण अडवाणींचे योगदान अविस्मरणीय आहे. राष्ट्रीय एकात्मता आणि सांस्कृतिक पुनर्जीवनासाठी त्यांनी अद्वितीय कार्य केले आहे. आदरणीय अडवाणीजींचे या निमित्ताने हार्दिक अभिनंदन आणि शुभेच्छा. शेवटी केंद्रीय रेल्वेमंत्री ना.दानवेंनी माननीय पंतप्रधान नरेंद्र मोदी यांचे मनःपूर्वक आभार मानले.



## डॉ. पांडवे यांना राष्ट्रीय गौरव पुरस्कार

आधुनिक केसरी न्यूज



**छत्रपती संभाजीनगर :** लोक निर्माण ग्रामीण विकास व संशोधन संस्थांच्या 25व्या सिल्वर जुबली वर्धापन दिनानिमित्त डॉ. बलराज पांडवे सेवानिवृत्त वैद्यकीय अधिकारी छत्रपती संभाजी नगर यांना माननीय डॉ. ऋषिकेश कांबळे प्रसिद्ध साहित्यिक, संस्थेच्या अध्यक्षा अर्चना मेडेवार व सचिव सीमा गुंडेळे यांचे हस्ते साहित्य क्षेत्रातील कामगिरीबाबत व वैद्यकीय क्षेत्रातील योगदानाबाबत राष्ट्रीय गौरव पुरस्कार देऊन सन्मानित करण्यात आले याप्रसंगी युकेचे आकाश कुमार, हिमाचल प्रदेशचे डॉ राकेश कुमार, सिकंदराबादचे नरसिंगराव, नाशिकच्या प्राध्यापिका श्रद्धा दुसाने आदी मान्यवरांच्या उपस्थितीमध्ये पुरस्कार प्रदान करण्यात आले.

## पुढाऱ्यांना गावांच्या सीमा झाल्या खुल्या : प्रा. जीवन कोलते पाटील

आधुनिक केसरी न्यूज

**सोयगाव :** तालुक्यात व सावळदबारा परिसरात आता मराठा समाजाला आरक्षण मिळाल्याने गावापासून ते छत्रपती संभाजीनगर शहरापर्यंत सर्वत्र मराठा समाज बांधव जल्लोष करत असल्याचे प्रा. जीवन कोलते पाटील सामाजिक कार्यकर्ते यांनी बोलताना सांगितले आहे. आरक्षणाचा प्रश्न मार्गी लागल्याने राजकीय पुढार्यांना असलेली गाव बंदी सैल झाल्याने मोठा आनंद झाला आहे. मराठा समाजाला ओबीसी प्रवर्गातून आरक्षण देण्याची मागणी गेल्या अनेक वर्षापासून लावून धरण्यात आली होती. मागील अनेक वर्षाचा आरक्षणाचा लढा मनोज जरांगे पाटील यांच्या नेतृत्वाखाली यशस्वी झाले. अंतरवाली सराटी येथील लाठीचार्जमुळे मराठा समाज अधिक आक्रमक झाला. यामुळे सबंध महाराष्ट्रातील मराठा समाज मनोज जरांगे पाटील यांच्या मागे उभा राहिला. विविध ठिकाणी लाखोंच्या सभा, प्रत्येक गावागावात उपोषणे, रास्ता रोको, मोर्चे अशाप्रकारे आंदोलन सुरू झाले. उल्लेखनीय म्हणजे कधी नव्हे ते गावात राजकीय पुढार्यांना गावबंदी करण्यात आली,सावळदबारा परिसरात मोलखेडा,डाभा,हिवरी व सावळदबारा गावात वेशीवरच गावबंदीचे फलक लागले होते. यामुळे अनेक ठिकाणी वाद-विवाद झाले. पुढाऱ्यांच्या गाड्या वेशीवर आडविण्यात आल्या. गाव बंदी करण्यात आल्यामुळे प्रामुख्याने सत्ताधारी नेत्यांना फटका बसला. गेले अनेक दिवस पुढाऱ्यांना गावात जाणे टाळावे लागत होते. एकीकडे लोकसभा विधानसभा निवडणुका तोंडावर आलेल्या असताना, विकास कामे उरकण्याचा सपाटा चालू झाला. तर दुसरीकडे आंदोलनामुळे कामे रेंगाळलेली होती. परंतु आता मराठा आरक्षणाची मागणी राज्य शासनाकडून मान्य करण्यात आल्यामुळे, व मनोज जरांगे पाटील यांच्या आंदोलनाला यश आल्यामुळे, मराठा समाज बांधव आनंद उत्सव साजरा करीत आहे. तर पुढार्यांनी ही आता सुटकेचा निश्वास सोडला आहे.अशी माहिती प्रा जीवन कोलते पाटील सामाजिक कार्यकर्ते यांनी सांगितले.



## श्रीगुरुदेव संगीत विद्यालयाचे सुयश

आधुनिक केसरी न्यूज

**मेहकर :** अखिल भारतीय गांधर्व महाविद्यालय मंडळ मुंबईच्या नोव्हेंबर -२०२३ ला तबला, हार्मोनियम आणि गायनाच्या झालेल्या परीक्षेचा निकाल नुकताच जाहीर झाला आहे. मेहकर येथील चनखोरे कॉलनीतील श्रीगुरुदेव संगीत विद्यालय मागील २२ वर्षांपासून विद्यार्थ्यांना शास्त्रीय गायन, हार्मोनियम आणि तबल्याचे शिक्षण देत आहे. श्री गुरुदेव संगीत विद्यालयाच्या विद्यार्थ्यांनी नोव्हेंबर - २०२३ मध्ये झालेल्या या परीक्षेमध्ये चांगले गुण मिळवून सुयश प्राप्त केले आहे. श्री गुरुदेव संगीत विद्यालयातील विद्यार्थी नोव्हेंबर - २०२३ या सत्रातील तबला आणि हार्मोनियम परीक्षेला बसले होते. यामध्ये कैवल्य चाकोते , साई तुपकर हे विशेष योग्यते मध्ये व सिद्धी धोटे ही प्रथम श्रेणीत तबला प्रारंभिक परीक्षेत उत्तीर्ण झाली आहे. तर, प्रवेशिका प्रथम , तबला या परीक्षेमध्ये अथर्व रोडसमुद्रे आणि वेदांत चाकोते या विद्यार्थ्यांनी प्रथम श्रेणीत यश प्राप्त केले आहे. प्रीती जोशी आणि निरीक्षा जोशी यांनी हार्मोनियम च्या प्रवेशिका पूर्ण परीक्षेत प्रथम श्रेणीत यश प्राप्त केले आहे.सार्थक मगर व यथार्थ खिल्लारी या विद्यार्थ्याने प्रवेशिका पूर्ण तबला परीक्षेत प्रथम श्रेणीमध्ये यश प्राप्त केले आहे .तर, ओंकार भाले याने मध्यमा पूर्ण तबला परीक्षेमध्ये यश मिळविले आहे. सर्व विद्यार्थी व विद्यार्थिनी आपल्या यशाचे श्रेय आईवडील आणि संगीत मार्गदर्शक भगवान राईतकर व सौ.गीता राईतकर यांना देतात.

## वाडी फाटा येथील शाळेत पालक मेळावा

आधुनिक केसरी न्यूज



**फुलंब्री :** तालुक्यातील पिंपळगाव वळण मतेवाडी फाटा येथील आदर्श प्राथमिक माध्यमिक, उच्चमाध्यमिक व ग्रामगीता माध्यमिक शाळेत पालक मेळावा संपन्न झाला. यावेळी पालकाची उत्स्फूर्त अशी उपस्थिती होती.पालकांनी शैक्षणिक गुणवत्ता संदर्भात शिक्षकाशी सविस्तर चर्चा केली. या पालक सभेचा अध्यक्ष स्थानी संस्थेचे अध्यक्ष तथा शेतकरी संघटनेचे जिल्हा अध्यक्ष काशिनाथ जाधव यांची उपस्थिती होती. मुख्याध्यापिका अश्विनी जाधव, सहशिक्षक अनिल थोरात, सहशिक्षिका निता ठाकुर,सविता लांडगे यांनी मार्गदर्शन केले.अध्यक्ष भाषणात यावेळी काशिनाथ जाधव यांनी सांगितले की, दैंनदिन अभ्यासक्रमासह विवध उपक्रम शाळेत सुरू केले आहे. तसेच स्पर्धेत विद्यार्थी टिकावा म्हणून विद्यार्थ्यांची नवोदय, स्कॉलरशिप याची तयारी साठी जास्तीची तासिका शाळेत सुरू केली आहे. पाल्याचा होणारा विकास पालकांना वेळी वेळी शिक्षकानं कडून महिन्यातून एक दिवस काढून पाल्याची तपासणी करावी. यावेळी मुख्याध्याक योगेश जाधव, मुख्यधापिका अश्विनी जाधव, सहशिक्षक सचिन निर्मळ, अन्सार शेख, अनिल गायकवाड, संदीप निधोंनकर, वैशाली तायडे, निता ठाकूर, सविता लांडगे, पुष्पा काकडे, कल्पना आघाडे,अनिल थोरात, जिवन पवार, भाऊसाहेब शिरसाठ, आकाश म्हस्के, शिक्षक शिक्षकेत्तर कर्मचारी यांची उपस्थिती होती. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन व आभार प्रदर्शन सहशिक्षक परसराम घुगे यांनी केले.

## लोणार ते जालना तपोधाम पदयात्रा : १४ वर्षांपासून भाविक काढतात गुरू गणेश पदयात्रा

आधुनिक केसरी न्यूज

**यासीन शेख**

**लोणार :** घोर तपस्वी कर्नाटक गजकेसरी प. पू. गुरु गणेशलालजी महाराज यांच्या ६२ व्या पुण्यतिथीनिमित्त लोणार ते जालना तपोधाम गुरु गणेश पदयात्रा आज ६ फेब्रुवारी रोजी सकाळी सहा वाजता या पदयात्रेची सुरुवात धीरज भवन पासून झाली. यंदा ही भाविक मोठ्या संख्येने पदयात्रेत सहभागी झालेले आहेत. येत्या ९ फेब्रुवारी रोजी तपोधाम जालना येथे विविध कार्यक्रम होणार आहेत. पुण्यतिथीनिमित्त श्री गुरु गणेश मिश्री वर्ल्ड ग्रुप लोणारच्या वतीने गत १४ वर्षांपासून पदयात्रा काढण्यात येते. यंदा पदयात्रेचे १५ वे वर्ष आहे.

येत्या ८ फेब्रुवारी रोजी पदयात्रा तपोधाम येथे पोहोचणार आहे. पदयात्रेमध्ये सुशिल डोंगरवाल अनिलकुमार झांबड, रुषभ बेदमुथा शुभम गेलडा, यश राका, रुषभ गेलडा रुषभ कोठारी, लखन संचेती,वैभव संचेती, मित बेदमुथा सह नयवयुक पदयात्रेत सहभागी झाले आहे तर पदयात्रेची धूरा श्री गुरु गणेश मिश्री वर्ल्ड ग्रुप चे अनिल संचेती, पारस गेलडा,अक्षय संचेती, दर्शन नवलखा, स्वेत जोगड, हर्षवर्धन रुणवाल, सुमित बेदमुथा,रोशन बेदमुथा जयेश संचेती, निलेश संचेती, प्रितम डोंगरवाल आदि संभालत आहे. तर आज पहिल्याच दिवशी शिंधी येते किसन मामा बोडखे परिवार कदूंन पायीवारी चे स्वागत करण्यात आले. त्याचप्रमाणे ठीक ठिकाणी पायीवारी चे स्वागत करण्यात येणार आहे. पायीवारीमध्ये आकर्षित रित्या जैन ध्वजानी व गणेशलालजी महाराज यांच्या फोटोने सजवलेली गाड़ी सर्वाचे लक्ष्य वेधत आहे.

**असा राहणार पदयात्रेचा मार्ग :** लोणार येथून६/०२/२०२४ला सकाळी५ .३०ला पाईवारी मार्गस्थ होईल जय गुरु गणेश पदयात्रेचा मार्ग लोणार मातमल-शिंदी - बीबी-दुसरबीद- किंनगांव राजा- सिंदखेडराजा ते गुरु गणेश भवन, जालना असा राहणार आहे .



# 'जाणता राजा' महानाट्याला चंद्रपूरकरांचा उत्स्फूर्त प्रतिसाद

आधुनिक केसरी न्यूज

**चंद्रपूर :** छत्रपती शिवाजी महाराजांच्या राज्याभिषेकाला 350 वर्षे पूर्ण झाल्याच्या निमित्ताने सांस्कृतिक कार्य मंत्री तथा जिल्ह्याचे पालकमंत्री सुधीर मुनगंटीवार यांच्या पुढाकारातून 'जाणता राजा' या महानाट्याचे प्रयोग राज्याच्या सर्व जिल्ह्यांमध्ये आयोजित करण्यात येत आहे. चंद्रपूरमध्येही सांस्कृतिक कार्य विभाग, जिल्हा प्रशासन आणि चंद्रपूर महानगरपालिका यांच्या संयुक्त विद्यमाने चांदा क्लब मैदानावर आयोजित या महानाट्याने संपूर्ण जिल्हा ढवळून निघाला.
प्रत्येक जिल्ह्यात 'जाणता राजा' या महानाट्याचे तीन दिवस प्रयोग होत आहे. मात्र चंद्रपूर जिल्ह्यातील नागरिकांचा उदंड प्रतिसाद पाहता, चंद्रपूर येथे एक अतिरिक्त दिवस वाढवून जिल्ह्याचे पालकमंत्री सुधीर मुनगंटीवार यांनी जिल्हावासियांना अनोखी भेट दिली. चार दिवसात हजारो नागरिकांनी 'याची देही...याची डोळा' असा छत्रपती शिवाजी महाराजांचा जीवनपट प्रत्यक्षात अनुभवला. जिल्हा प्रशासनाच्या उत्कृष्ट नियोजनामुळे या महानाट्याने चंद्रपूरकरांच्या डोळ्यांचे पारणे फेडले.
जिल्हा प्रशासन व मनपाचे उत्कृष्ट नियोजन : 'जाणता राजा' महानाट्य निःशुल्क असले तरी गैरसोय होऊ नये यादृष्टीने जिल्हा प्रशासन व चंद्रपूर महानगरपालिकेतर्फे पासेस वाटण्याचे नियोजन करण्यात आले. जिल्हाधिकारी विनय गौडा यांनी प्रत्येक तालुक्यातील तहसीलदार व गटविकास अधिकारी यांना याबाबत सुचना केल्या. तसेच मनपा मुख्य कार्यालय व प्रत्येक झोन कार्यालयात पासेस वाटपाचे काऊंटर उघडण्यात आले व तेथे जबाबदार अधिकारी नेमण्यात आले. जिल्ह्यातील सर्व शाळा, महाविद्यालये यांना कार्यक्रमास उपस्थित राहण्यास ठराविक दिवस देण्यात आला. मनपातर्फे आरोग्य विभागाचे 24 कर्मचारी शिफ्टनुसार पूर्णवेळ कार्यक्रम स्थळी उपस्थित होते. रुग्णवाहिका व अन्य प्रथमोपचाराची सोय येथे ठेवण्यात आली होती. प्रत्येक दिवसाचा प्रयोग संपताच मनपा स्वच्छता कर्मचारी 1 तासाच्या आत स्थळ स्वच्छ करीत होते. यात संपूर्ण परिसरात असलेला कचरा उचलुन स्वच्छ करणे, मोबाईल टॉयलेट स्वच्छ करणे, मोबाईल टॉयलेट टँक स्वच्छ राहील याची खात्री करणे, स्टेजवर सुक्ष्म कचरा राहणार नाही याची खात्री करणे इत्यादी कार्य मनपा स्वच्छता विभागातर्फे 4 दिवस निरंतर करण्यात आली.
जाणता राजा' प्रयोगाला चंद्रपूरकरांचा उदंड प्रतिसाद : छत्रपती शिवाजी महाराजांचे व्यक्तिमत्व प्रभावीपणे मांडणाऱ्या 'जाणता राजा' या महानाट्याला जिल्ह्याच्या विविध भागातील जनतेने मोठ्या संख्येने हजेरी लावून उदंड प्रतिसाद दिला. प्रेक्षकांची अलोट गर्दी व 'छत्रपती शिवाजी महाराज की जय', 'जय भवानी, जय शिवाजी'चा गजर आसमंतात निनादला.शिवशाहीर महाराष्ट्रभूषण बाबासाहेब



पुरंदरे यांच्या दिग्दर्शनात 'जाणता राजा' नाट्यकृतीची निर्मिती झाली होती. आतापर्यंत देशात व विदेशात या महानाट्याचे शेकडो प्रयोग झाले आहेत. शिवछत्रपतींच्या पूर्वीचा महाराष्ट्र, महाराष्ट्रामध्ये असलेली तत्कालीन परिस्थिती, त्यानंतर शिवरायांचा झालेला जन्म, तरुण वयात स्वराज्य स्थापनेची घेतलेली शपथ, प्रशासनावरची जरब, अफजलखानाचा वध, शाहिस्तेखानावर केलेला हल्ला, आग्र्यावरून झालेली सुटका, शिवरायांचा राज्याभिषेक आदी विविध घटनांना उजाळा देणारे प्रसंग यामध्ये जीवंत करण्यात आले आहे. प्रभावी संवाद, भव्य फिरत्या रंगमंचावर 200 पेक्षा अधिक कलाकार व तंत्रज्ञानाच्या मदतीने प्रसंगानुरुप उभे करण्यात आलेले देखावे, विविध परंपरा व लोककलांचे सादरीकरण, घोडे, उंट असा लवाजमा, भव्यदिव्य नेपथ्य, प्रकाशयोजना, संगीत संयोजन व उत्तम संवादफेक प्रेक्षकांना भुरळ पाडणारे होते. रोज चार दिवस तब्बल तीन तास प्रेक्षकांना महानाट्याने खिळवून ठेवले.

# वकील -न्यायाधीशामध्ये जोरदार शाब्दिक चकमक

आधुनिक केसरी न्यूज

**नागपूर :** गोंदिया जिल्हा न्यायालयात एका प्रकरणाच्या सुनावणीदरम्यान वकिलाने थेट न्यायाधीशांसोबतच वाद घातला. वकील आणि न्यायाधीशामध्ये जोरदार शाब्दिक चकमक झाल्यावर न्यायालयाचा अवमान केल्याप्रकरणी न्यायाधीशांनी वकिलाला पाच दिवसांची शिक्षा आणि ८० रुपयांचा दंड ठोठावला. सोमवारी गोंदिया जिल्हा न्यायालयात दुपारच्या सुमारास ही घटना घडली. पराग तिवारी (वय ५०) असे शिक्षा सुनावलेल्या वकिलाचे नाव आहे.



तिवारी यांनी दंड भरण्यास नकार दिल्याने त्यांची कारागृहात रवानगी करण्यात आली आहे. प्राप्त माहितीनुसार, न्यायाधीश अभिजित कुलकर्णी यांच्यासमक्ष एका प्रकरणाची सुनावणी सुरू होती. दरम्यान, पक्षकाराचे वकील पराग तिवारी यांना न्यायालयात पोहोचायला विलंब झाला. यावरून न्या. कुलकर्णी यांनी थेट पक्षकाराला वकील बदलविण्याचा सल्ला दिला. यावर तिवारी यांनी आक्षेप घेतला. यावरून न्या. कुलकर्णी व तिवारी यांच्यात शाब्दिक चकमक झाली. याप्रकरणी न्या. तिवारी यांना ८० रुपयांचा दंड किंवा दंड न भरल्यास ५ दिवस सश्रम कारावासाची शिक्षा सुनावली. तिवारी यांनी दंड न भरता शिक्षेला स्वीकार केला. यामुळे गोंदिया पोलिसांनी तिवारी यांना ताब्यात घेऊन त्यांची कारागृहात रवानगी केली. गोंदियातील घटनेबाबत गोंदिया बार काउंसिलने निषेध व्यक्त केला आहे. नागपूर बार काउंसिलचे माजी अध्यक्ष ॲड. कमल सत्तुजा यांनी दिलेल्या माहितीनुसार, गोंदिया जिल्ह्याचे पालकत्व असलेले मुंबई उच्च न्यायालयातील नागपूर खंडपीठातील न्यायमूर्ती एम. चांदवानी यांच्याशी संबंधित घटनेबाबत तक्रार केली जाणार आहे. वकिलांवर अन्याय करणारी ही घटना असून भविष्यात अशाप्रकारच्या घटना घडू नये यासाठी उपाययोजना करण्याची विनंती केली जाणार आहे. तिरोडा बार असोसिएशनेदेखील याबाबत परिपत्रक काढून निषेध व्यक्त केला आहे.

# आरक्षण वाचवण्यासाठी मोठ्या संख्येने महामोर्चात सहभागी व्हा

आधुनिक केसरी न्यूज

**चंद्रपूर :** महाराष्ट्र शासनाने 27 डिसेंबर 2023 व 26 जानेवारी 2024 रोजी घेतलेल्या निर्णयांमुळे जात वैधता प्रमाणपत्र मिळण्याच्या अटी शिथिल झाल्याने ओबीसी, एससी,एसटी, एनटी,व्हिजेएनटी प्रवर्गात बोगस लोकांची घुसखोरी होण्याची शक्यता निर्माण झाली आहे.सरकारच्या या निर्णयामुळे ओबीसी, एससी एसटी, एनटी,व्हिजेएनटी प्रवर्गाचे आरक्षण धोक्यात आले असुन या निर्णयांच्या विरोधात दि.7 फेब्रुवारी 2024 रोजी दुपारी 12 वाजता गांधी चौक ते जिल्हाधिकारी कार्यालय चंद्रपूर पर्यंत भव्य मोर्चाचे आयोजन करण्यात आले आहे.या महामोर्चात जिल्ह्यातील ओबीसी, एससी एसटी, एनटी,व्हिजेएनटी प्रवर्गातील नागरिकांनी मोठ्या संख्येने सहभागी व्हावे असे आवाहन मोर्चाचे संयोजक सचिन राजुरकर , प्रमोद बोरीकर, दिनेश चोखारे, प्रवीण खोब्रागडे, नंदू नागरकर, कृष्णा मसराम,रविंद्र टोंगे, विजय बलकी, प्रेमानंद जोगी, सतीश भिवगडे, डॉ संजय घाटे, पप्पु देशमुख, मनदीप रोडे, ॲड पुरुषोत्त सातपुते, पांडुरंग टोंगे, शाम लेडे, सूर्यकांत खणके, प्रा अनिल शिंदे, डॉ दिलीप कांबळे, विजय मडावी, भोला मडावी, राजा अडकीने, नभा वाघमारे,मनीषा बोबडे, गोमती पाचभाई यांनी एका पत्रका द्वारे केले.
राज्य शासनाने मराठा आरक्षणासंदर्भात सगेसोयरे या शब्दाची व्याख्या बदलून मराठा समाजाला कुणबी प्रमाणपत्र देण्यासाठी महाराष्ट्र शासन राजपत्र असाधारण भाग चार ब, दिनांक 26 जानेवारी 2024 नुसार मसूदा काढला आहे. हा मसुदा आरक्षण मिळणाऱ्या सर्वच प्रवर्गातील नागरिकांसाठी भविष्यात धोकादाय ठरू शकतो. त्यामुळे ओबीसी, एससी एसटी, एनटी,व्हिजेएनटी प्रवर्गातील नागरिकांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे. शिंदे समिती ही घटनात्मक नसताना शिंदे समितीच्या शिफारसीवरून कुणबी प्रमाणपत्र देणे सुध्दा घटनाबाह्य आहे. शासनाच्या या अन्यायकारक भूमिकेचा विरोध नोंदविण्याकरिता तसेच 27 डिसेंबर 2023 राजपत्र रद्द करणे व ओबीसी, एससी एसटी, एनटी,व्हिजेएनटी सोबत सर्व समाजाची जातनिहाय जनगणना करण्यात यावी या मागण्यांसाठी 7 फेब्रुवारीला चंद्रपूर जिल्हाधिकारी कार्यालयावर महामोर्चा धडकणार आहे. महाराष्ट्र अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती, विमुक्त जाती, भटक्या जमाती, इतर मागास व विशेष मागास प्रवर्ग (जातीचे प्रमाणपत्र देण्याचे व त्यांच्या पडताळणीचे विनियमन) अधिनियम 2000 मध्ये बदल करणासाठी सरकारने राजपत्र काढले असून त्या मुळे प्रमाणपत्र मिळण्यास बोगसगिरी होण्याचे प्रमाण जास्त होऊ शकते , म्हणून राजपत्र रद्द करण्याच्या आणि ओबीसी (विजा, भज, विमाप्र ) "अनुसूचित जाती / जमाती व इतर समाजाची जात निहाय जनगणनेच्या मागण्यांसाठी महामोर्चाचे आयोजन करण्यात आले आहे.

# सर्व कामे एकाच कंत्राटदारास दिल्याने विरोधी पक्ष आक्रमक

आधुनिक केसरी न्यूज

**सुशिल गायकवाड**

**लोणंद :** एकाच कंत्राटदारास सर्व कामे दिली गेल्याने विरोधी पक्षाकडून या प्रकरणी आक्षेप घेत आक्रमक पवित्रा घेण्यात आलेला असून सगळी कामे एकाच कंत्राटदारास देण्यामागे काही आर्थिक हितसंबंध आहेत काय असा संशय निर्माण होतो आहे.असे विरोध पक्षाचे म्हणणे असून या संबंधात पत्रकार परिषद घेऊन आक्षेप नोंदविण्यात आलेला आहे.पत्रकार परिषदेतून असे म्हटले आहे की,लोणंद नगरपंचायतने पाणी पुरवठा विभागाच्या कामाच्या मंजुरी साठी विशेष सर्व साधारण सभा बोलावली होती.या कामांच्या संदर्भात सत्ताधारी गटाने सर्व कामे एकत्रित रित्या एकाच कंत्राटदारास देण्याचा घाट घातला होता.याबाबत विरोधी गटाने यास तीव्र विरोध केला आहे.परंतु, बहुमताच्या आधारावर सत्ताधारी गटाने हे विषय ८ विरुद्ध ५ अशा मतांनी मनमानी पद्धतीने मंजूर करून घेऊन नगर पंचायतीचे आर्थिक आणि धोरणात्मक नुकसान केले आहे. याबाबत विरोधी गटाकडून मांडलेले मुद्दे असे,सर्व कामे एकाच कंत्राटदारास देणे हे संस्थेच्या आर्थिक हिताचे नाही.यामधून स्पर्धात्मक दराचा फायदा संस्थेला होणार नाही.तसेच,सर्व कामे एकाच कंत्राटदारास दिल्यास प्रत्येक कामासाठी नगर पंचायतीस त्या कंत्राटदारावर अवलंबून राहावे लागेल हे धोरणात्मक दृष्ट्या नगर पंचायतीसाठी अगदी धोक्याचं आहे.याशिवाय प्रत्येक कामासाठी लागणारे कौशल्य हे एका कंत्राटदाराकडे मिळणे अवघड असल्या कारणाने यामध्ये कामाची गुणवत्ता राखणे हे कठीण आहे.याकामी वेगवेगळ्या कंत्राटदारांशी समन्वय साधण्याचं काम हे त्या त्या विभाग प्रमुखाचे असल्याने या जबाबदारी पासून पळ काढून कर्तव्यात कुचराई करण्याची योजना सत्ताधाऱ्यांच्या सोबत प्रशासनातील काही अधिकाऱ्यांनी केलेली आहे काय असा प्रश्न यातून निर्माण होतो. याशिवाय सगळी कामे एकाच कंत्राटदारास देण्यामागे काही आर्थिक हितसंबंध आहेत काय असा संशय निर्माण होतो आहे. असेही विरोधी गटाने मांडले आहे.सर्व कामे एकत्रितरित्या एकाच कंत्राटदारास देण्याचा प्रकार हा लोणंदच्या आज पर्यंतच्या इतिहासात कधीच झालेला नाही.तसेच या विषयाच्या संदर्भात विरोधी गटाकडून सविस्तर माहितीची टिपणी देण्याचा आग्रह केलेला असताना देखील आजतागायत प्रशासनाकडून कोणतीही सविस्तर माहिती लेखी स्वरूपात दिलेली नाही.त्यामुळे यामध्ये नक्कीच काहीतरी गौडबंगाल असण्याचा संशय निर्माण होतो आहे.याशिवाय ज्या कंत्राटदारांच्या तक्रारी कामगार आयुक्तांच्या समोर चालू आहेत.त्या कंत्राटदारांस निविदा प्रक्रियेमध्ये समाविष्ट करू नये. अशी जोरदार मागणी विरोधी गटाने केली आहे.तसेच स्थळ पाहणी अहवाल हा सर्व कंत्राटदारांस सक्तीचा करावा.हे सुद्धा विरोधी पक्षाने मत मांडले आहे.

# बेरड समाज उन्नती व बहुउद्देशीय मंडळ, जयमल्हार क्रांती संघटनेचा नावीन्यपूर्ण उपक्रम

आधुनिक केसरी न्यूज

**धुळे :** ०४ फेब्रुवारी २०२४ रोजी कल्याण भवन, धुळे येथे दुपारी ४ वाजेपासून ते रात्री ९ वाजेपर्यंत बेडर समाज उन्नती व बहुउद्देशीय मंडळ धुळे व जय मल्हार क्रांती संघटना महाराष्ट्र राज्य यांच्या वतीने महिलांचा हळदी कुंकू व भेटवस्तू वाटपाचा कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता. सदरील कार्यक्रमास समाजातील महिला, पुरुष व लहान मुले-मुली मोठ्या संख्येने उपस्थित होते.
कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी प्रकाशराव सोनवणे, अशोक कांबळे, कैलास जाधव, श्रीमती अनुसया गायकवाड, उषा जाधव, मिनाक्षी गायकवाड हे होते. मान्यवरांच्या उपस्थित सर्वप्रथम प्रभु श्रीरामचंद्र यांच्या प्रतिमेचे - पुजन करून, छत्रपती शिवाजी




महाराज व आद्यक्रांतीवीर राजे उमाजी नाईक यांच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण करून व दिपप्रज्वल करून कार्यक्रमाची सुरुवात करण्यात आली.. यावेळेस आयोजकांतर्फे उपस्थित मान्यवरांचा पुष्पगुच्छ देवून सत्कार करण्यात आला. सदरील कार्यक्रमाच्या वेळेस मुली व महिलांसाठी रांगोळी स्पर्धा, मुले-मुलींसाठी नृत्य स्पर्धा व मुली- महिलांसाठी संगीत खुर्चीची स्पर्धा घेण्यात आली. तसेच विजेत्या स्पर्धकांना मान्यवरांच्या हस्ते आद्यक्रांतीवीर राजे उमाजी नाईक यांची प्रतिमा असलेली ट्रॉफी बक्षिस म्हणून देण्यात आली. तसेच उपस्थित महिलांना आकर्षक भेटवस्तू देण्यात आली.

# मनपाची १४ पथके ॲक्शन मोडवर

## गौतमनगर येथील ४ मालमत्ता धारकांची नळजोडणी खंडित

आधुनिक केसरी न्यूज





**चंद्रपूर :** मालमत्ता व पाणीकराची करवसुली मोठ्या प्रमाणात थकीत असल्याने मनपातर्फे करवसुली मोहीम सातत्याने राबविण्यात येत आहे. कर वसुलीसाठी मनपाद्वारे १४ पथके ॲक्शन मोडवर कार्य करीत असुन पथकांद्वारे गौतम नगर येथील ४ नळधारकांची नळ जोडणी खंडित करण्यात आली आहे.

मनपाचे ५१ अधिकारी - कर्मचारी यांची पथके कर वसुलीत सातत्याने कार्यरत असुन थकबाकी वसुली तसेच थकबाकी न भरल्यास नळ जोडणी कपात करण्याची कारवाई केली जात आहे. गौतम नगर येथील नानाजी वैरागडे,जोगेश्वरी पेरगे,पोचूराम वैरागडे,पेंटाजी दहागावकर या ४ मालमत्ताधारकांवर मोठ्या प्रमाणात थकबाकी आहे. वारंवार वसुली पथकाद्वारे पाठपुरावा केल्यानंतरही सदर मालमत्ताधारकांनी कराचा भरणा न केल्याने कारवाई करण्यात आली आहे.

इतर काही थकबाकीदारांद्वारे रोख,धनादेश अथवा ऑनलाईन पद्धतीने कराचा भरणा केला जात असुन काही थकबाकीदारांनी ठराविक मुदतीत कर भरण्याचे मान्य केले आहे. ज्यांनी मुदत मागितली आहे त्यांची नोंद ठेवण्यात आली असुन वेळेवर करभरणा न झाल्यास नळ जोडणी खंडीत करण्याची कारवाई केली जाणार आहे.

असा करावा भरणा - WWW. CMCCHANDRAPUR.COM या लिंकवर PAY WATER TAX ONLINE या टॅबवर पाणीपट्टी कराचा तर HTTPS://CHANDRAPURMC. ORG या लिंकवर मालमत्ता कराचा ऑनलाईन भरणा करता येणे शक्य आहे. त्याचप्रमाणे फोन पे, गुगल पे,भीम या युपीआय ॲपवर सुद्धा मालमता व पाणी कराचा भरणा करता येणे शक्य आहे.मनपाच्या झोन कार्यालयांमध्ये प्रत्यक्षरीत्या कराचा भरणा करता येईल. तसेच व्हॉट्सॲप चॅटबॉटचा वापर करून सुद्धा मालमत्ता कर भरता येणार असुन याकरिता 8530006063 या क्रमांकावर वर “HI” टाईप करून आलेल्या उत्तरात ४ था क्रमांकाचा पर्याय निवडुन कर भरता येईल. शास्तीत सवलत - मनपातर्फे ०१ फेब्रुवारी २०२४ ते ३१ मार्च २०२४ पर्यंत थकबाकीसह मालमत्ता कराचा एकमुस्त भरणा करणाऱ्या मालमत्ता धारकास शास्तीत २५ टक्के सवलत देण्यात येत आहे.

# बिबट्या सफारी बारामतीऐवजी जुन्नरला

आधुनिक केसरी न्यूज

**पुणे :** जुन्नरऐवजी बारामतीमध्ये बिबट्यासह टायगर आणि आफ्रिकन सफारी असा तीन टप्प्यांत मोठा प्रकल्प महाविकास आघाडी सरकारच्या काळात तत्कालीन उपमुख्यमंत्री, वित्तमंत्री आणि जिल्ह्याचे पालकमंत्री अजित पवार यांनी प्रस्तावित केला होता. याबाबत पवारांनी सादर केलेल्या अर्थसंकल्पात खर्चही नमूद केला होता आणि या प्रकल्पाच्या आराखड्याचे कामही सुरू झाले होते. मात्र, गेल्या काही वर्षांपासून बिबट्या सफारी जुन्नर तालुक्यातच करण्याबाबत मागणी होत होती. अखेर मंत्रिमंडळ बैठकीत बारामतीऐवजी जुन्नरलाच बिबट्या सफारी करण्याचा निर्णय घेण्यात आला. हा निर्णय अजित पवारांना धक्का मानला जात आहे. मानव बिबट्या संघर्षाची सर्वात मोठी समस्या जुन्नर तालुक्यात आहे. भाजप-शिवसेना युती सरकारच्या काळात तत्कालीन वनमंत्री सुधीर मुनगंटीवर यांनी जुन्नर तालुक्यातील आंबेगव्हाण येथे बिबट्या सफारीला तत्वतः मंजुरी दिली होती. मात्र, राज्यात सत्तांतर होऊन महाविकास आघाडी सरकारच्या काळाता उपमुख्यमंत्री आणि जिल्ह्याचे पालकमंत्री अजित पवार यांनी अर्थसंकल्पात बारामती बिबट्या सफारीसाठी ६० कोटींची तरतुद केली होती. त्यामुळे जुन्नरमधून बिबट्या सफारी हा प्रकल्प बारामतीला पळविल्याची ओरड सुरू झाली होती. त्यानंतर जुन्नरच्या सफारीच्या सविस्तर प्रकल्प अहवालासाठी (डीपीआर) पवार यांनी निधी मंजूर केला होता. कुरण-खानापूर आणि आंबेगव्हाण यांपैकी एके ठिकाणी हा प्रकल्प होणार होता.

# निवडणुकीचा जिल्हाधिकाऱ्यांकडून आढावा

आधुनिक केसरी न्यूज

**चंद्रपूर :** आगामी लोकसभा निवडणूक–2024 च्या पार्श्वभुमीवर चंद्रपूरचे जिल्हाधिकारी विनय गौडा जी.सी. यांनी चंद्रपूर लोकसभा मतदारसंघात समाविष्ट असलेल्या वणी व आर्णी (जि. यवतमाळ) येथील निवडणूक तयारीचा आढावा घेतला तसेच मतदारसंघातील मतदान केंद्र व स्ट्राँग रुमची पाहणी केली. यावेळी त्यांच्यासोबत यवतमाळचे जिल्हाधिकारी पंकज अर्शिया उपस्थित होते. उपविभागीय कार्यालय वणी येथे वरील दोन्ही विधानसभा मतदारसंघाची आढावा बैठक पार पडली. बैठकीला सहाय्यक जिल्हाधिकारी याशिनी नागराजन तसेच उपविभागीय अधिकारी नितीन हिंगोले यांच्यासह मतदार संघातील उपविभागीय पोलीस अधिकारी, तहसीलदार, नायब तहसिलदार व नोडल अधिकारी आणि कर्मचारी उपस्थित होते. सदर आढावा सभेत लोकसभा निवडणूक 2024 च्या अनुषंगाने पूर्वतयारीचा आढावा घेण्यात आला. यात मतदारसंघात राबविण्यात येणाऱ्या स्वीप ॲक्टिव्हिटी अंतर्गत मतदान जनजागृती व मतदार नोंदणी, नव मतदारांची नोंदणी, मयत व स्थलांतरित नावे कमी करणे, यादी शुद्धीकरण, महिलांचा सहभाग तसेच मतदानाची टक्केवारी वाढवणे यावर चर्चा करण्यात आली. वंचित घटक जसे तृतीयपंथी, देहविक्री करणा-या स्त्रिया, भटक्या जाती जमातीतील व्यक्ती, आदिवासी यांचे समावेशन करण्यासाठी केलेल्या उपाययोजना यावरसुध्दा चर्चा करण्यात आली. यावेळी जिल्हाधिकारी विनय गौडा यांनी मतदान केंद्रातील पायाभूत सुविधा, संवेदनशील मतदान केंद्रे, मागील निवडणुकांमधील निवडणूक संदर्भातील दाखल झालेले गुन्हे व झालेली कारवाई तसेच निवडणुकीच्या अनुषंगाने करावयाची प्रतिबंधात्मक कारवाई याबाबत संबंधित अधिका-यांना सुचना दिल्या. तसेच भारत निवडणूक आयोगाकडून प्राप्त होणाऱ्या विविध सूचना यांची अंमलबजावणी करणे आणि आदर्श आचारसंहितेचे पालन करणे याबाबतही त्यांनी मार्गदर्शन केले. एकाच इमारतीमध्ये पाच पेक्षा जास्त मतदान केंद्र असलेल्या इमारती तसेच स्ट्राँग रुम आणि डिस्पॅच हॉलला त्यांनी भेट देऊन प्रत्यक्ष पाहणी केली व त्यासंबंधी करावयाच्या उपाययोजना याविषयी निर्देश दिले.





# भारतीय तैलीक साहू महासभेची रविवार बैठक

## प्रदेश तेली महासंघाचे पदाधिकारी उपस्थित राहणार

आधुनिक केसरी न्यूज

**छत्रपती संभाजीनगर :** अखिल भारतीय तैलीक साहू महासभा, नवी दिल्ली अंतर्गत प्रदेश तेली महासंघाची आढावा बैठक आयोजित केली. रविवार, ११ फेब्रुवारी २०२४ रोजी दुपारी २ वाजता अग्रेसन भवन सिडको येथे ही मराठवाडास्तरीय बैठक होईल. या बैठकीस राष्ट्रीय अध्यक्ष, माजी मंत्री जयदत्त क्षीरसागर यांच्या अध्यक्षतेखाली तर महाराष्ट्र प्रदेश अध्यक्ष विजय चौधरी यांच्या प्रमुख उपस्थितीमध्ये बैठक होईल. यावेळी सर्व समाजबांधव आणि पदाधिकारी यांनी उपस्थित राहण्याचे आवाहन करण्यात आले. या कार्यक्रमाच्या नियोजनासाठी मराठवाडा अध्यक्ष ॲड. दीपक राऊत यांच्या निवासस्थानी केंद्रीय कार्यकारिणी सदस्य मनोज संतान्से यांच्या अध्यक्षतेखाली बैठक पार पडली. या बैठकीस मराठवाडा अध्यक्ष ॲड. दीपक राऊत, राष्ट्रीय कार्यकारिणी सदस्य मनोज संतान्से, भगवान मिटकर, वैद्यकीय आघाडीचे डॉ. उमेश रायते, उद्योग आघाडीचे भारत कसबेकर, शासकीय आघाडीचे संतोष वाळके, युवा प्रदेश अध्यक्ष साई शेलार, अभियंता आघाडीचे विलास व्यवहारे, रमेश बागले, जिल्हाध्यक्ष सुरेश कर्डीले, सुरेश मिटकर, शिक्षक आघाडीचे संजय सोनवणे, महिला आघाडीच्या नीलिमा आंबेकर, अलका शिंदे, उमेश मिसाळ, योगेश मिसाळ, कृष्णा राऊत, जगदीश नादरकर आदीसह समाजबांधव उपस्थित होते.

# भूगोलाचे स्वरूप बदलत चालले आहे : प्रा.डॉ. अभिजीत धुलगुडे

## नवीन संकल्पना समजून घेण्याची कौशल्ये आत्मसात करावी लागतील

आधुनिक केसरी न्यूज




**सुशिल गायकवाड**

**लोणंद :** भुगोल दिनाचे औचित्य साधुन लोणंद ता.खंडाळा येथील रयत शिक्षण संस्थेच्या शरदचंद्र पवार महाविद्यालयामध्ये भूगोलशास्त्र विभाग व अग्रणी महाविद्यालय अंतर्गत विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करणाऱ्या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी "भूगोल विषयातील आधुनिक तंत्रज्ञान व करीयरच्या संधी" या विषयावर मार्गदर्शन करण्यासाठी मधोजी महाविद्यालय फलटण येथील प्रा. डॉ. अभिजीत धुलगुडे यांना आमंत्रित करण्यात आले होते. ते म्हणाले की,भूगोल महर्षी डॉ.सी.डी.देशपांडे यांच्या कार्याला उजाळा मिळावा.तसेच मकर संक्रांत व सूर्याचे उत्तरायण यातील संबंद्धाची माहिती व्हावी व शालेय स्तरावर दुर्लक्षित मानल्या जाणाऱ्या भूगोल या विषयाकडे सामान्य माणसापासून ते राज्यकर्त्यांपर्यंत सर्वांचेच लक्ष जावे. यासाठी भूगोल दिन साजरा करण्यात येत आहे. अलीकडे जी.आय.एस,जी.पी.एस, रिमोट सेन्सिंग,उपग्रह प्रतिमा या आधुनिक तंत्रज्ञानामुळे भूगोलाचे स्वरूप झपाट्याने बदलत चालले आहे. पुस्तकांतून ही सर्व माहिती वाचून ती लक्षात ठेवणे कठीण आहे.त्यासाठी आलेख, आकृत्या, नकाशा वाचन व नवीन संकल्पना समजून घेण्याची कौशल्ये आत्मसात करावी लागतील. म्हणून ज्ञानापेक्षा कौशल्यावर अधिक भर देणे गरजेचे आहे.महाविद्यालयीन स्तरावर केवळ 'भौगोलिक ज्ञान व कौशल्ये आत्मसात करून भागणार नाही तर त्या ज्ञानाची व कौशल्याची सांगड देशाचे व समाजाचे प्रश्न सोडवण्यासाठी घालणे आवश्यक आहे.असे सुद्धा प्रा.डॉ.अभिजीत धुलगुडे यांनी सांगितले. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे प्र. प्राचार्य डॉ. बाळासाहेब जाधव होते.अध्यक्षीय मनोगतात जाधव म्हणाले,विद्यार्थ्यांनी विविध कला गुण अवगत करून त्याचा वापर आपल्या जीवनामध्ये करणे आवश्यक आहे.कला गुणांतून स्वतःचे अस्तित्व निर्माण करता येते. अशा उपक्रमांच्या माध्यमातून विद्यार्थ्यांमध्ये नवचेतना व उर्जा मिळत आहे.विद्यार्थ्यांनी नक्कीच अशा उपक्रमांतून प्रेरणा घेऊन महाविद्यालयाचा नावलौकिक वाढवावा. भूगोल सप्ताह निमित्त महाविद्यालयांतर्गत प्रश्नमंजुषा, भित्तीपत्रके, रांगोळी, भौगोलिक लेख इ. स्पर्धा व भौगोलिक साहित्यांचे प्रदर्शन संपन्न झाले. प्रास्ताविक,स्वागत व पाहुण्यांचा परिचय भूगोल विभाग प्रमुख प्रा.रविंद्र सोनवणे यांनी करून दिला.या कार्यक्रमासाठी उपप्राचार्य प्रा.भिमराव काकडे, प्रा. एम. डी.नायकू, प्रा.भारत सकटे, प्रा.सतीश कांबळे, प्रा.जालिंदर वाघ व विद्यार्थी मोठ्या संखेने उपस्थित होते.या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रा प्रकाश कोळी यांनी केले तर आभार प्रदर्शन प्रा.चव्हाण एस.एस.यांनी मानले.

# वर्धा-कळंब मार्गावर लवकरच पॅसेंजर धावणार

आधुनिक केसरी न्यूज

**यवतमाळ :** बहुप्रतिक्षित वर्धा-यवतमाळ-नांदेड रेल्वे मार्गाचे काम वर्धा ते कळंब या मार्गावर पूर्ण झाले आहे. कोणत्याही परिस्थितीत या मार्गावर लोकसभा निवडणुकीपूर्वी रेल्वे सुरू करण्यासाठी रेल्वे प्रशासन कामी लागले आहे. या मार्गाचे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या हस्ते लोकार्पण होणार असल्याची चर्चा सुरू असताना आता रेल्वे मंडळाने वर्धा ते कळंब या मार्गावर पॅसेंजर रेल्वे सुरू करण्याचा निर्णय घेत तसे वेळापत्रकही प्रसिद्ध केले आहे. विदर्भासह मराठवाड्याला विकासाच्या मार्गावर आणण्यासाठी गेल्या १५ वर्षांपासून या रेल्वेमार्ग प्रकल्पाचे काम सुरू आहे. हा महत्त्वाकांक्षी गेल्या पाच वर्षात मार्गी लागला आहे. विशेष बाब म्हणून ६० टक्के केंद्र सरकार, तर ४० टक्के राज्य सरकारच्या निधीतून तयार होत असलेल्या या रेल्वे प्रकल्पाच्या कामाला गती आली आहे. वर्धा-यवतमाळ-नांदेड हा २८४.६५ किमीचा मार्ग आहे. यातील ३८.६१ किमीचा वर्धा ते कळंब हा मार्ग पूर्ण झाला असून, उर्वरित २४६.५ किमीच्या कळंब- नांदेड मागांचे काम वेगात सुरू आहे. या मार्गावरील ८० पैकी ३२ मोठया पुलांची कामे पूर्ण झाली आहेत, तर रोड ओव्हर बीजची ४३ कामे प्रगतिपथावर आहेत.

# ग्राम पंचायतच्या वतीने विद्यार्थ्यांचा सत्कार

आधुनिक केसरी न्यूज

**सिद्धार्थ वाठोरे**

**हदगाव :** ग्रामपंचायत कार्यालय, उंचाडाच्या वतीने जिल्हा परिषद प्राथमिक शाळा, उंचाडा येथील विद्यार्थी व शिक्षकांचा यथोचित सत्कार करण्यात आला.

श्री संत नंदी महाराज पुण्यतिथी व यात्रा महोत्सवानिमित्त मौजे कवाना ता.हदगाव जि.नांदेड येथे भव्य शालेय लेझीम स्पर्धा २०२४ चे आयोजन करण्यात आले होते. या स्पर्धेत जिल्हा परिषद प्राथमिक शाळा, उंचाडा येथील संघ दरवर्षीप्रमाणे याही वर्षी मोठ्या हिरहिरीने सहभागी झाला होता.या स्पर्धेत जवळपास १३ संघ सहभागी झाले होते.

जिल्हा परिषद प्राथमिक शिक्षक उंचाडा येथील कर्तव्यदक्ष मुख्याध्यापक गणेशराव गाढे सर यांच्या मार्गदर्शनाखाली लेझीम पथक प्रमुख सुर्यवंशी सर यांनी पुढाकार घेऊन शाळेतील विद्यार्थ्यां कडून चांगल्या पध्दतीने सलग आठ-दहा दिवस सराव घेवून प्रस्तुत स्पर्धेत सहभाग घेतला होता.

या स्पर्धे मध्ये जिल्हा परिषद प्राथमिक शाळा, उंचाडा या संघाला व्दितीय क्रमांकाचे १६५५५/- रूपयाचे बक्षिस मिळाले.

शाळेतील शिक्षकांने चांगल्या पध्दतीने विद्यार्थ्यांकडून सराव करून घेऊन स्पर्धेतील व्दितीय क्रमांकाचे बक्षीस जिंकून दिल्या बद्दल उंचाडा नगरीचे युवा नेते तथा सरपंच संघटनेचे जिल्हा उपध्यक्ष श्री विलासराव चव्हाण यांनी पुढाकार घेऊन शाळेतील सर्व गुणी विद्यार्थ्यांना खाऊ वाटप करण्याचा आणि सर्व शिक्षकांचा यथोचित सत्कार करण्याचा निर्णय घेतला

अनुषंगाने शाळा व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष गजानन निल्लेवार, शाळेचे मुख्याध्यापक गणेशराव गाढे, मारोतराव सुर्यवंशी, शिवाजी राठोड, मारोती राठोड, श्रीमती राजकन्या येणुरे, कुमारी ऐश्वर्या पौळ, शालेय पोषण आहार कर्मचारी श्रीमती आनुसया चव्हाण, श्रीमती महानंदाबाई निल्लेवार यांचा यथोचित सत्कार करण्यात आला.



युवा नेते विलासराव चव्हाण यांच्या कडून यावेळी शाळेतील सर्व गुणी विद्यार्थ्यांना मिठाई चे वाटप करण्यात आले . सदरील कार्यक्रम यशस्वीपणे घडवून आणण्यासाठी विलासराव चव्हाण, उपसरपंच दिनकरभाऊ चव्हाण, पांडुरंग कदम,व्हाईस चेअरमन संभाजी पाटील, ज्ञानेश्वर गणेशराव चव्हाण, शाळा व्यवस्थापन समिती चे माजी अध्यक्ष अरविंदभाऊ चव्हाण, बाबारावजी चव्हाण, ज्ञानेश्वर दिगांबर चव्हाण, शाळा व्यवस्थापन समिती चे माजी उपाध्यक्ष श्याम पाटील चव्हाण, ज्ञानेश्वर भाऊ चव्हाण( माऊली ), विठ्ठलराव मगर, जनक निल्लेवार, संदिप चव्हाण, सामाजिक कार्यकर्ते पत्रकार सुरजभाऊ चव्हाण यांनी विशेष परिश्रम घेतले .या कार्यक्रमास कोळी केंद्राचे केंद्रप्रमुख यु पी चव्हाण सरांची विशेष उपस्थितीती होती .

# प्रभावी अभिव्यक्तीसाठी भाषिक कौशल्यांचा विकास आवश्यक : देवेश गोंडाने

आधुनिक केसरी न्यूज

**चंद्रपूर :** आपण सर्व भाषा विषयाचे विद्यार्थी आहोत. त्यामुळे मानवी समाजातील भाषेचे महत्त्व आपल्याला सर्वप्रथम माहिती असायला हवे आपल्या संवाद क्षमतेत खऱ्या अर्थाने क्रांती झाली ती आधुनिक मुद्रण तंत्राच्या मदतीने, प्रबोधनाचे युग व औद्योगिक क्रांतीला चालना मिळाली. प्रभावी अभिव्यक्तीसाठी व व्यक्तिमत्व विकासासाठी अभिव्यक्तीच्या विविध रूपांचा विकास तसेच विविध भाषिक कौशल्यांचा विकास विद्यार्थ्यांनी करावा असे वक्तव्य मा. देवेश गोंडाणे यांनी केले. छत्रपती शाहू महाराज शिक्षण संस्था द्वारा संचालित, रामकृष्ण वाघ कॉलेज ऑफ आर्ट्स अँड कॉमर्स येथे मराठी विभागाच्या माध्यमातून मुद्रित माध्यमांसाठी लेखन कौशल्य विकास* कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले होते. या कार्यशाळेत ते मुख्य वक्ता म्हणून बोलत होते. या प्रसंगी व्यासपीठावर प्रमुख पाहुणे मा. देवेश गोंडाणे वरिष्ठ पत्रकार लोकसत्ता, प्रभारी प्राचार्या डॉ. अर्चना कहाळे पत्की, माजी प्रभारी प्राचार्य पंकज झगडे, समाजशास्त्र विभाग प्रमुख प्रा. निकोसे, मराठी विभाग प्रमुख प्रा. सायली लाखे पिदळी आदींची उपस्थिती होती. कार्यक्रमाच्या प्रारंभी मान्यवरांच्या हस्ते सरस्वती मातेच्या प्रतिमेचे पूजन करून दीपप्रज्वलन करण्यात आले, त्याचप्रमाणे पाहुण्यांचे स्वागत शब्दसुमनांनी करण्यात आले.

यावेळी पुढे बोलताना देवेश गोंडाने यांनी मुद्रित माध्यमांसाठी लेखन कौशल्य करत असताना विद्यार्थ्यांमध्ये कुठले गुण असायला हवेत , शब्दसंग्रह कसा वाढवावा आणि वाचनाचे महत्त्व काय या विषयांसह विद्यार्थ्यांना या क्षेत्रात असलेल्या विविध संधीवरही त्यांनी मार्गदर्शन केले. या कार्यक्रमास संस्थेचे संस्थापक सचिव डॉ. मारोती वाघ आणि संचालिका सौ. लता वाघ यांचे मार्गदर्शन लाभले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक मराठी विभाग प्रमुख प्रा. सायली लाखे पिदळी यांनी केले, तर सूत्रसंचालन लतिशा ककोडिया यांनी केले आणि आभार दीक्षा माने यांनी मानले. अध्यक्षीय मनोगत प्रभारी प्राचार्य डॉ. अर्चना कहाळे पत्की यांनी मांडले.

# मोफत साखर व चणा डाळ किटचे वाटप

आधुनिक केसरी न्यूज

**अंबरनाथ :** अयोध्येतील श्रीराम मंदिर लोकार्पण सोहळा नुकताच पार पडला यानिमित्ताने तसेच शिवसेनेचे खासदार डॉ. श्रीकांत शिंदे यांच्या वाढदिवसानिमित्त दिनांक कोहोजगाव येथील दसरा मैदान, चिंचपाडा येथे आमदार डॉ. बालाजी किणीकर यांच्या हस्ते हजारो नागरिकांना मोफत साखर व चनाडाळ किटचे वाटप करण्यात आले.

सदर कार्यक्रमाचे आयोजन शिवसैनिक विकास सोमेश्वर व युवासेना अंबरनाथ शहराध्यक्ष राहुल सोमेश्वर यांनी केले होते. यावेळी परिसरातील नागरिकांनी'जय श्रीराम' संगीतमय भजनाचा देखील मनसोक्त आनंद घेतला.अयोध्येतील श्रीराम मंदिर लोकार्पणच्या आनंदात घरोघरी दिवाळी साजरी व्हावी यासाठी हा उपक्रम राबविला असल्याचे विकास सोमेश्वर यांनी सांगितले. यावेळी वरिष्ठ पोलीस निरीक्षक जगन्नाथ कळसकर, शिवसेनेचे उपशहरप्रमुख संदिप मांजरेकर, पुरुषोत्तम उगले, निखिल चौधरी, चंद्रकांत मोटे तसेच शिवसेनेचे पदाधिकारी कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते. गायक शर्मा यांच्या आवा 3 संगीतमय भजन, आणि सांस्कृतिक गाण्याने परिसर श्रीराममय झाला होता.

# खुलताबाद तालुक्यातील कुटुंब सर्वेक्षण पूर्ण, नागरिकांकडून उत्तम प्रतिसाद

आधुनिक केसरी न्यूज

**खुलताबाद :** तालुक्यातील ग्रामीण व शहरी भागातील नागरिकांचे कुटुंब सर्वेक्षण प्रक्रिया पूर्ण करण्यात आली यात नागरिकांनी चांगला प्रतिसाद दिला.

राज्य मागासवर्ग आयोगाने दिलेल्या निर्देशानुसार खुलताबाद तालुक्यात २३जानेवारी ते २फेब्रुवारी २०२४ मराठा समाज व खुले प्रवर्ग व आरक्षित प्रवर्गातील कुटुंबांचे सर्वेक्षण पूर्ण करण्यात आले यात उद्दिष्टापेक्षा अधिकचे काम झाले.१०३.५८ टक्के काम झाले म्हणजे उद्दिष्टापेक्षा अधिक ३.५८टक्के काम झाल्याची माहिती मा तहसीलदार स्वरुप कंकाळ यांनी दिली.

खुलताबाद तालुक्याची लोकसंख्या १लाख ३७ हजार २०३ आहे.तर २७ हजार ४४१घरे आहेत. यात २८हजार ४२३ घरांचे सर्वेक्षण करण्यात आले.

या सर्वेक्षण साठी १५पर्यवेक्षक तर २५६प्रगणकची नेमणुक करण्यात आली होती.सर्वेक्षणात १००टक्के सर्वेक्षण करण्यात आले.तसेच खुलताबाद शहरात २हजार ९७१ कुटुंबांचे सर्वेक्षण करण्यात आले येथे २पर्येवेक्षक ३४प्रगणकांनी काम केले. राज्य मागासवर्ग आयोगाने दिलेल्या निर्देशानुसार खुलताबाद शहर व ग्रामीण मराठा व खुल्या तथा आरक्षित प्रवर्गातील कुटुंबांचे सर्वेक्षण पुर्ण करण्यात आले व यास नागरिकांकडून चांगला प्रतिसाद मिळाला.



# आनंदनगरीतून आर्थिक व्यवहाराचे ज्ञान

आधुनिक केसरी न्यूज


**वैजापूर :** शालेय स्तरावरील मुलां-मुलींना आनंदनगरी व बाल आनंद मेळाव्यातून वेगवेगळे स्टॉल वरील खाद्य पदार्थ विकून व्यवहारिक ज्ञानासोबत आर्थिक व्यवहार ही हाताळण्याचे ज्ञान मिळते जे त्यांच्या भविष्यात उपयुक्त ठरू शकेल ,असे प्रतिपादन विद्याधन इंग्लिश माध्यमाच्या शाळेतील आनंद नगरी चे उदघाटन प्रसंगी माजी शिक्षणाधिकारी धोंडीरामसिंह राजपूत यांनी सोमवार( ता,०५ )रोजी केले, या आनंदनगरीत या शाळेच्या विद्यार्थ्यांनी तीस स्टॉल विविध खाद्य पदार्थांचे लावले होते, या प्रसंगी कृषी उत्पन्न बाजार समिती सदस्य तथा मर्चंट बँक संचालक प्रशांत त्रिभुवन, पत्रकार संघ अध्यक्ष भानुदास धामणे,सचिव किरणसिंह राजपूत,उपाध्यक्ष अशोक बोराडे, कोषाध्यक्ष रियाजुद्दीन शेख, या विद्यालयाच्या अध्यक्षा सौ,आशा गायके,सचिव दिगंबर गायके,प्राचार्या-भारती पाटील, पालक वर्ग,शिक्षक वर्ग मोठ्या संख्येने उपस्थित होते,

# चिमुकल्यांच्या कलाविष्कारांनी ग्रामस्थ मंत्रमुग्ध; जि.प. शाळेचे स्नेहसंमेलन

आधुनिक केसरी न्यूज

**वसंत पाटील**

**वाशिम :** लेझीम नृत्य, देशभक्ती गीतावरील नृत्य आणि हिंदी, मराठी चित्रपटातील गाण्यावर चिमुकल्यांनी सादर केलेल्या नृत्यविष्कारणे ग्रामस्थांना मंत्रमुग्ध केले. सुमारे चार तास चाललेल्या या कार्यक्रमात जिल्हा परिषद शाळेचे स्नेहसंमेलन उत्साहात पार पडले. प्रजासत्ताक दिनाचे औचित्य साधून शेलुखडसे येथील जिल्हा परिषद शाळेत स्नेहसंमेलन कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. सदर कार्यक्रमाचे उद्घाटन जिल्हा परिषद सदस्य अमित पाटील खडसे यांच्या हस्ते करण्यात आले. मान्यवरांच्या हस्ते महापुरुषांच्या प्रतिमेचे पूजन करुन कार्यक्रमाची सुरुवात झाली. गावातली संत गजानन महाराज मंदीर सभागृहाच्या भव्य अशा मंचावर लहानग्यांनी सादर केलेला नृत्याविष्कार उपस्थितांना अचिंबित करून गेला. अंगणवाडी शाळेतील चिमुकल्यांनी सादर केलेल्या समूह नृत्याने सर्वांचेच लक्ष वेधून घेतले होते. जिल्हा परिषद शाळेच्या विद्यार्थ्यांनी सादर केलेल्या ' संदेशे आते हैं, हमे तडपाते है ' या गीतावरिल नृत्याने सीमेवर तैनात असलेल्या जवानांच्या भावनांना उजाळा दिला.तर ' आमच्या पप्पांनी गणपती आणला ' या रेकॉर्ड ब्रेक गाण्यावरील नृत्याने कार्यक्रमाच्या उत्साहात विशेष भर घातली होती. दरम्यान शाळा समितीचे उपाध्यक्ष शरद खडसे यांनी फेब्रुवारी महिन्याच्या शेवटच्या दिवसी सेवानिवृत्त होणारे जिल्हा परिषद शाळेचे शिक्षक श्री.जोशी यांना भेटवस्तू देऊन सन्मानित केले. कार्यक्रमासाठी तयार करण्यात आलेल्या आकर्षक रंगमंचावर चिमुकल्यांच्या कलागुणांना वाव मिळाल्याचे यावेळी प्रकर्षाने जाणवत होते. सदर कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी जिल्हा परिषद शाळेचे मुख्याध्यापक, शिक्षक, आणि अंगणवाडी सेविका, मदतनीस यांनी खुप परिश्रम घेतले. त्यांना गावातली युवकांनी सुद्धा भरपुर सहकार्य केले. लहानग्यांचे कौतुक करण्यासाठी त्यांच्या पालकांसह, शेकडोच्या संख्येने ग्रामस्थांची उपस्थिती होती. विद्यार्थ्यांच्या अंगातील सुप्त गुणांना वाव मिळावा या उद्देशाने जिल्हा परिषद शाळेच्या वतीने आयोजित केलेले स्नेसंमेलन उत्साहात पार पडले.

हिवराळे क्लिनिक
ॲण्ड हर्बल हेल्थ केअर
9130174444
डॉ. के.बी. हिवराळे
आयुर्वेद जनरल फिजिशियन,
ॲक्युपंक्चर तज्ज्ञ
B.A.M.S., N.D.,C.M.S.& Ed(MUMBAI)
R.No.2366/12/2000
एमसीए/2022/10/बी/000839 बॉम्बे नर्सिंग होम
परवाना क्र.218, औरंगाबाद
उपलब्ध सुविधा
- जुनाट सांधे दुखी (गुडघे दुखी)
- आम वात उदर रोग
- दमा व ॲलर्जी (जुनाट)
- चिकन गुनिया
- मनोकयीईक आजार
- त्वचा व गुप्त रोग
- स्त्रीयांचे आजार
- स्थूलपणा, मूळव्याध
- वंध्यत्व, संतती प्राप्ती
- कॅन्सर सल्ला, मुतखडा
- वजन वाढविणे
- वजन कमी करणे
- केसांच्या सर्व तक्रारी
- लहान मुलांची
- स्मरणशक्ती वाढविणे
पंचकर्म सुविधा (मुख्यकार्य) 1) वमन, 2) विरेचन, 3) बस्ती, 4) नस्य, 5) रक्तमोक्षन

अजिंठा रोड, सारा कॉलनी, फुलंब्री, ता. फुलंब्री, जि. औरंगाबाद

# किशनराव चव्हाण विद्यालयात स्नेहसंमेलन उत्साहात

आधुनिक केसरी न्यूज

**बि. डी. रामपूरकर**

**जिंतूर :** किशनराव चव्हाण विद्यालयात वार्षिक स्नेहसंमेलन मोठ्या उत्साहात शाळेच्या प्रांगणात विद्यार्थ्यांच्या कलागुणांना वाव देण्यासाठी विद्यालयाच्या वतीने दिव्य व भव्य असे कलाविष्कार सादर करण्यात आले. या सांस्कृतिक कार्यक्रमाचे अध्यक्ष रामराव उबाळे माजी जिल्हा परिषद समाज कल्याण सभापती, उद्घाटक राजेश सरवदे (तहसीलदार जिंतूर), प्रमुख पाहुणे पी. बी. गोफणे( पोलीस उपविभागीय अधिकारी), टी. एस. पोले (गट शिक्षणाधिकारी), ॲड.मनोज सरडा, डॉ. योगेश दहिफळे, डॉ. नारायण नागरे, एम.डी. घुगे (केंद्रप्रमुख), अशामती उबाळे (माजी सभापती न.प.जिंतूर), नरवाडे (गटशिक्षणाधिकारी), बि. डी. रामपूरकर (कार्याध्यक्ष ई.मिडीया जिंतूर ता.), राहुल उबाळे (गट साधन केंद्र ),कामखेडे सर, ढाकणे आदींच्या उपस्थितीत कार्यक्रमांची दीप प्रज्वलन करण्यात आले. व उपस्थित प्रमुख पाहुण्यांचे शाल श्रीफळ देऊन सत्कार करण्यात आला. यानंतर शाळेतील विद्यार्थ्यांनी स्वागत गीताने उपस्थित मान्यवरांचे शब्द सुमनांनी स्वागत केले. त्याचबरोबर या सांस्कृतिक कार्यक्रमांसाठी विद्यार्थ्यांच्या कलागुणात भर पडावी त्यासाठी शहरातील विविध क्षेत्रातील मंडळी उपस्थित होती. व आजी-माजी विद्यार्थी पालक कर्मचारी बहुसंख्य महिला व ग्रामस्थ आवर्जून उपस्थित होते. या सांस्कृतिक कार्यक्रमांची सुरुवात स्वागत गीताने होवुन त्यासोबतच ललाटी भांडार, टुकूर टुकूर, छमक छमक छमके, पाटलांचा बैलगाडा, मराठी माणूस रिमीक्स, मै निकला गड्डी लेके, नऊवारी साडी, नाटक, बानू झाली धनगरीन,जलवा जलवा, आदि गाण्यांनी बहारदार अविष्कार सादर केला व उपस्थित प्रेक्षकांचे मन जिंकली बालकलाकारांचे टाळ्यांच्या गजराने उत्स्फूर्तपणे कौतुक केले.
या संस्कृतीत कार्यक्रमासाठी तहसीलदार राजेश सरवदे, डॉ. योगेश दहिफळे, टी.एस.पोले गटशिक्षण अधिकारी यांनी आपले मनोगत व्यक्त केले तर शेवटी अध्यक्ष समारोप संस्थेचे अध्यक्ष व माजी जिल्हा परिषद समाज कल्याण सभापती रामराव उबाळे यांनी अध्यक्षीय समारोप पर आपले



मनोगत व्यक्त केले. सांस्कृतिक कार्यक्रम यशस्वी होण्यासाठी शाळेतील मुख्याध्यापक, शिक्षक, कर्मचारी आदींनी परिश्रम घेतले तर परमेश्वर वाकळे माध्यमिक मुख्याध्यापक यांनी शाळेच्या वतीने प्रास्ताविक सादर केले. सूत्रसंचालन ज्ञानेश्वर चव्हाण, तर अश्रू कुलालसर यांनी आभार मानले.



# जाधव दांपत्याने समाजसेवेतून विश्वास संपादन केला : अभिनेत्री तेजश्री प्रधान

आधुनिक केसरी न्यूज

**अहमदनगर :** नगरसेविका सौ. अश्विनी सचिन जाधव व अहमदनगर महानगर पालिकेच्या स्थायी समितीचे माजी सभापती नगरसेवक सचिन जाधव यांचे सामाजिक कार्य अत्यंत चांगले व दखल पात्र आहे. या दांपत्याने आपल्या भागातील जनतेची सेवा करून विश्वास संपादन केला आहे. त्यामुळे त्यांचे भविष्य उज्वल आहे, असे प्रतिपादन सुप्रसिद्ध सिने अभिनेत्री तेजश्री प्रधान यांनी केले. संवेदना फाउंडेशन व नगरसेविका सौ. अश्विनी सचिन जाधव यांच्या संयुक्त विद्यमाने दाळ मंडई येथे महिलांसाठी हळदी कुंकू समारंभ, विविध स्पर्धा व लकी ड्रॉ च्या बक्षीस वितरण समारंभात त्या बोलत होत्या. मा. महापौर शिला ताई शिंदे, फुलपाखरू या मालिकेच्या निर्मात्या सुवर्णा सांगळे, उद्योजक राजेंद्र शिंदे, ॲड. संतोष गायकवाड, मा नगरसेवक सचिन जाधव व संवेदना फाउंडेशन चे पदाधिकारी यावेळी उपस्थित होते.
यावेळी बोलतांना अभिनेत्री तेजश्री प्रधान म्हणाल्या, मी महाराष्ट्रात अनेक ठिकाणी कार्यक्रमाला गेले मात्र हळदी कुंकवाच्या कार्यक्रमासाठी महिलांची एवढी मोठी लक्षणीय उपस्थिती मी प्रथमच अनुभवली. महिलांच्या मोठ्या उपस्थिती वरून नगरसेविका सौ. अश्विनी सचिन जाधव व सचिन भाऊ जाधव यांचे सामाजिक कार्य व जन माणसांमधील त्यांचा विश्वास याचे दर्शन घडले.
अहमदनगर दक्षिण चे खा. डॉ. सुजय दादा विखे व त्यांच्या सुविद्य पत्नी धनश्री ताई विखे यांनी दिल्लीवरून व्हिडिओ कॉल द्वारे नगरसेविका सौ. अश्विनी जाधव व सचिन जाधव यांनी आयोजित केलेल्या हळदी कुंक समारंभ, स्पर्धा व लकी ड्रॉ च्या बक्षीस वितरण कार्यक्रमास शुभेच्छा दिल्या.
उद्योजक राजेंद्र शिंदे म्हणाले की, सचिन जाधव यांच्यातील माणुसकी, नम्रता, प्रामाणिकपणा व चांगुल पणा या गुणांमुळे मी त्यांच्याकडे आकर्षित झालो. संवेदना फाउंडेशन च्या माध्यमातून आपल्या सामाजिक कार्याला नवीन आयाम देतील असा मला ठाम विश्वास असे. नगरसेविका सौ. अश्विनी सचिन जाधव यांनी कार्यक्रमाचे प्रास्ताविक व उपस्थित मान्यवरांचे स्वागत केले. उध्दव काळापहाड व शिवानी शिंगवी यांनी कार्यक्रमाचे बहारदार सूत्रसंचालन केले. सिने पत्रकार भगवान राऊत यांनी सिने अभिनेत्री तेजश्री प्रधान यांचा परिचय करून दिला. सचिन जाधव यांनी आभार मानले. या कार्यक्रमास आरती काळे नगरकर आदी मान्यवर यावेळी उपस्थित होते.
मान्यवरांच्या हस्ते छत्रपती शिवाजी महाराजांच्या पुतळ्यास अभिवादन करण्यात आले. तसेच मान्यवरांच्या हस्ते दीप प्रज्वलन करून हळद कुंकू समारंभाचे उद्घाटन झाले. उद्योजक राजेंद्र शिंदे यांच्या शुभहस्ते संवेदना फाउंडेशन या सामाजिक संस्थेचे उद्घाटन करण्यात आले. कार्यक्रमाच्या यशस्वितेसाठी वैभव काळे, रोहित राशीनकर, विजय काळे, संवेदना फाउंडेशन चे सर्व पदाधिकारी व कार्यकर्ते यांनी परिश्रम घेतले.

# किराणा दुकानात अवैध गुटखा पकडला

आधुनिक केसरी न्यूज

**निफाड :** देवगाव ता.निफाड येथे एक किराणा दुकानात अवैध गुटका विक्री करतांना आढळून आल्याप्रकरणी लासलगाव पोलिसांत गुन्हा दाखल करण्यात आला आहे. याबाबत सविस्तर वृत्त असे की, महाराष्ट्र शासनाचे अधिकृत अधिसुचनेप्रमाणे राज्यात उत्पादन, साठा, वितरण व साठ्यास प्रतिबंध असलेला व मानवी शरीरास अपायकारक व हानिकारक असा तंबाकू व विमल पान मसाला असा एकूण २८६० रु.चा.मुद्देमाल मिळून आला. सदर माल हा मानवी शरीरास अपायकारक व हानिकारक असल्याचे माहीत असूनही स्वतःच्या आर्थिक फायद्यासाठी साठा व विक्री करतांना मिळून आले म्हणून पो.शिपाई संदिप सांगळे यांच्या फिर्यादीवरून आरोपी किरण बाळासाहेब चव्हाण (वय ३२) श्रीकृष्णा किराणा दुकान रा.देवगाव यांचे विरोधात लासलगाव पोलीस ठाण्यात गु.र.न.३७/ २०२४ भा.द.वि ३२८,२७२, २७३,१८८ अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे. स.पो.नि भास्करराव शिंदे यांचे मार्गदर्शनाखाली पो.ना. औदुंबर मुरडनर अधिक तपास करीत आहेत.

# गहू काढणीला शेतकऱ्यांची तयारी

आधुनिक केसरी न्यूज

**बाजार सावंगी :** खुलताबाद तालुक्यातील बाजार सावंगी परिसर तथा महसूल मंडळ मधे ठिकठिकाणी गहु काढणीला आले असुण शेतकऱ्यांनी तयारी चालवली आहे. यंदा पावसाने सरासरी ही ओलांडली नाही.त्यात वेळेवरच पावसाने काढता पाय घेतला. यंदा परताची पाऊस झालच नाही.तर मध्यांतरी अवकाळी पावसाने फटकेबाजी केल्याने परिसरात सर्वत्र रब्बी पिकांतील गहु शालु ज्वारी हरभरा मका पिके शेतकऱ्यांनी घेतली त्यात यंदा म्हणावी तसी थंडीच पडली नसल्याने रब्बी पिकांना म्हणावे तसा फायदा झाला नाही. आताही थंडी काढता पाय घेत असल्याचे चित्र आहे तर सकाळी सकाळीच थंडी वाटतें तद्नंतर मात्र दमटपणा गर्माट व ऊन लागु लागला आहे. ज्यांचे गहु वेळेवर पेरा झाला होता त्यांचें गहु काढणीला आले आहे व शेतकरी ही गहु काढणीची तयारी करताना दिसत आहे.



गुप्तरोगाबाबत
काहीही लपवू नका



(रविवारी मोफत तपासणी)



डॉ. शेख ए.एच.

या अशा अडचणी असतात ज्या कोणाला सांगता येत नाहीत व न सांगितल्याने त्या वाढत जातात पण काळजी करू नका डॉक्टरपासून काहीही लपवू नये, ते आपले सर्व प्रश्न सहज सोडवितात. डॉ. शेख आजपर्यंत 200 पेक्षा अधिक पुरस्काराने सन्मानित, प्रचंड अनुभवी व अत्यंत माफक खर्चात इलाज करतात, आजपर्यंत लाखों पेशंटनी याचा अनुभव घेतलाय, आपली माहिती अत्यंत गुप्त ठेवली जाते, आयुर्वेदाने सर्व रोग नष्ट होतात, (रविवारी मोफत तपासणी).
आपल्या सर्व चिंताचा एकमेव उपाय म्हणजे डॉ. शेख यांचे नवजीवन आयुर्वेदीक डीस्पेंसरी. आजच भेट द्या व खात्री करा.

नवजीवन आयुर्वेदिक डिस्पेन्सरी

सेंट्रल बसस्टँड समोर, हॉटेल मिर्झा जवळ, औरंगाबाद.
फोन : (0240) 2350042, मो. : 9021111549 www.drshaikhah.in

# धनादेश न वटल्याने तीन महिने शिक्षा : सहा लाख पंचावन्न हजारांचा दंड

आधुनिक केसरी न्यूज

**अहमदनगर :** येथील श्री सदगुरु ग्रामीण बिगर शेती सहकारी पतसंस्थेकडून कर्जदार विशाल नारायण साबळे याने वाहन कर्ज घेतले होते. थकीत कर्ज फेडी साठी त्याने पतसंस्थेस धनादेश दिला होता. सदर धनादेश पतसंस्थेने त्यांचे खात्यात वटविण्यासाठी भरला असता तो चेक वटला नाही व पतसंस्थेस कर्जाचे पैसे मिळाले नाहीत. म्हणून पतसंस्थेने अहमदनगर येथील चिफ ज्युडिशियल मॅजिस्ट्रेट साहेब यांचे कोर्टात निगोशिएबल इंस्ट्रूमेंट्स ॲक्ट चे कलम 138 प्रमाणे फिर्याद दाखल केली. सदर केस ची पुढील सुनावणी अतिरिक्त मुख्य न्यायदंडाधिकारी श्री कर्वे साहेब यांचे समोर झाली. फिर्यादी पतसंस्थेकडून व्यवस्थापक सुरेश विठ्ठल कुलकर्णी यांची साक्ष नोंदविण्यात आली. तसेच अवश्यक तो कागदोपत्री पुरावा दाखल करण्यात आला. फिर्यादिची गुणदोषावर सुनावणी होऊन आरोपी विशाल नारायण साबळे यास दोषी धरून त्याला न्यायाधीश श्री दिपक कर्वे यांनी फौ.प्र.सं. 1973 चे कलम 255-2 नुसार तथा परक्राम्य संलेख अधिनियम 1881 चे कलम 138 मध्ये दोषी धरून तीन महिन्याची साधी कैद व रुपये सहा लाख पंचावन्न हजार दंड अशी शिक्षा दिली आहे. तसेच दंड न भरल्यास पंधरा दिवस साधी कैद देण्यात आली आहे. आरोपीने दंडाचे रकमे पैकी कलम 357-1 नुसार फिर्यादीस सहा लाख बावन्न हजार द्यावेत असा आदेश करण्यात आला आहे.
फिर्यादी पतसंस्थे कडून व्यवस्थापक सुरेश विठ्ठल कुलकर्णी यांची साक्ष ग्राह्यधरण्यात आली. संस्थेकडून ॲड शिवाजी अण्णा कराळे , ॲड करुणा रामदास शिंदे व ॲड सत्यजीत शिवाजी कराळे यांनी कामकाज पाहिले.

# नगर तालुका खरेदी विक्री संघाची निवडणूक बिनविरोध

आधुनिक केसरी न्यूज

**अहमदनगर :** नगर तालुक्यातील राजकीय दृष्टीने अत्यंत महत्त्वाची समजली जाणारी नगर तालुका खरेदी विक्री संघाच्या संचालक मंडळाची निवडणूक आज विरोधी महा आघाडीच्या सर्व उमेदवारांनी अर्ज मागे घेतल्यामुळे१७ जागांसाठी १८ फेब्रुवारी रोजी होणारी निवडणूक बिनविरोध झाली आहे.

यामुळे संघावर जिल्हा बँकेचे अध्यक्ष शिवाजीराव कर्डीले गटाची सत्ता अबाधित राहिली आहे.

बिनविरोध निवड झालेले उमेदवार सहकारी संस्था प्रतिनिधी मतदान संघ (१०) दत्तात्रय बबन राव नारळे , अशोक दशरथ कामठे, अजिंक्य वाल्मिक



नागवडे, संजय अप्पासाहेब धामणे,भारत गोपीनाथ फालके, संजना विठ्ठल पठारे, डॉ. राजेंद्र सूर्यभान ससे, आसाराम दशरथ वारुळे, मंगेश ठकाजी बेरड, बाबासाहेब सदाशिव काळे, व्यक्तिगत मतदार संघ -(२) रावसाहेब मारुती शेळके, मिनीनाथ एकनाथ दुशिंगे, महिला राखीव मतदार संघ (२) मंगल लक्ष्मण ठोकळ, मीना बाळासाहेब गुंड, इतर मागास प्रवर्ग (१) उत्कर्ष बाळासाहेब कर्डीले अनुसूचित जाती जमाती प्रवर्ग (१) जीवन भाऊसाहेब कांबळे, वि जा भ ज प्रवर्ग संतोष अर्जुन पालवे (१), रावसाहेब शेळके यांच्यासाठी निवडणूक बिनविरोध स्व. दादा पाटील यांच्या मृत्यूनंतर तालुका संघाची ही पहिलीच निवडणूक आहे, त्यांचा मुलगा रावसाहेब शेळके यांच्यासाठी निवडणुकीतून माघार घेत असल्याचे महा आघाडीच्या वतीने सांगण्यात आले. रावसाहेब शेळके यांना पुढील ५ वर्षासाठी चेअरमन करावे ,त्यांनीही आपल्या वडिलांचा आदर्श डोळ्यासमोर ठेवून काम करावे,सध्या तोट्यात असलेला संघ आगामी ५ वर्षात नफ्यात आणावा. ५ वर्षात संघाची कोणतीही जागा विकू नये,चांगला कारभार करण्यासाठी आम्ही त्यांना पाठिंबा देत आहोत .स्व.दादा पाटील शेळके यांना श्रद्धांजली म्हणून ही निवडणूक बिनविरोध करत आहोत असे प्रसिध्दी स दिलेल्या पत्रकात म्हटले आहे. या पत्रकावर बाबासाहेब गुंजाळ, संपतराव म्हस्के, संदेश कार्ले, प्रताप शेळके, प्रवीण कोकाटे, प्रवीण गोरे, अरुण म्हस्के राजेंद्र भगत, साहेबराव बोडखे, भाऊसाहेब चितळकर, महेंद्र शेळके, वैभव देवकर,गोरख सुपेकर, श्रीकृष्ण धाडगे, मारुती लांडगे, दादासाहेब वाघ यांच्या सह्या आहेत.



# इला हॅबिटाट येथे चित्रकला, निबंध, वक्तृत्व, छायाचित्र स्पर्धा उत्साहात

आधुनिक केसरी न्यूज

**पिंगोरी :** येथील इला हॅबीटेंट येथे निसर्ग संवर्धन, शिक्षण, प्रशिक्षण, संशोधन आणि आरोग्य या विषयांवर काम करणाऱ्या केंद्राचा दशकपूर्ती समारंभ आयोजित नुकताच करण्यात आला. यानिमित्त शालेय स्तरावर चित्रकला, निबंध, वक्तृत्व तसेच छायाचित्र स्पर्धा पार पडली. या स्पर्धातील विजेत्यांना पुरंदरचे तहसीलदार विक्रम राजपूत यांच्या हस्ते प्रमाणपत्र देण्यात आले. वन विभागाचे निवृत्त अधिकारी डॉ. अरविंदकुमार झा, आडाचीवाडीच्या सरपंच सुवर्णा पवार, दौंडजच्या सरपंच सीमा भुजबळ, पिंगोरीच्या उपसरपंच भाग्यश्री शिंदे, माजी सरपंच जीवन शिंदे, हमीद शेख, शांताराम राणे यांच्यासह वाघेश्वरी माध्यमिक विद्यालयातील विद्यार्थी यावेळी उपस्थित होते.

पुणे जिल्हा वन्यप्राणी व सर्परक्षक असोसिएशने महाराष्ट्रात वन्यजीव व सर्परक्षणामध्ये उल्लेखनीय कार्य केल्याबद्दल जेष्ठ सर्पमित्र सुशील विभुते, रघुनाथ वाडकर, विशाल शिंदे, श्रीकांत खेडकर, सनी कडके, विनायक मोहिते यांचा विशेष सन्मान करण्यात आला. राजकुमार पवार, राहुल लोणकर, अमोल शिंदे, अविष्कार भुजबळ, सचिन शिंदे, पांडुरंग मदने, भूषण भुजबळ यांनी संयोजन केले. प्रास्ताविक इला फाऊंडेशनचे अध्यक्ष डॉ. सतीश पांडे यांनी केले. सूत्रसंचालन राजकुमार पवार यांनी केले, तर डॉ. सुरूची पांडे यांनी आभार मानले.

**वेगवेगळ्या स्पर्धातील विजेते**

वक्तृत्व - वेदांत ताकवले, जेजुरी (प्रथम), आर्या रेवगे, दौंड (द्वितीय), कार्तिकी साळुंखे, मांडकी (तृतीय).चित्रकला ओवी धीरज मणेरे, जेजुरी, रूद्रांश नितीन पवार, हनुमानवस्ती (प्रथम), आर्यन राहुल ठोंबरे, मांडकी, इशिता योगेश भोसले, जेजुरी (द्वितीय), ईश्वरी संदीप रोमन, स्वराज कुलदीप साळवे, जेजुरी (तृतीय). निबंध - मोठा गट : श्रवणी संजय झगडे, कोळविहिरे (प्रथम), तन्वी दीपक पापळ, मांढर (द्वितीय), रोशनी रामदास जगताप, माहूर (तृतीय).

**लहान गट :** पोर्णिमा दादासाहेब थोपटे, पिंपरे खुर्द (प्रथम), क्रांती संतोष चांदगुडे, बऱ्हाणपूर (द्वितीय), अनुष्का संतोष गिरमे, कटफल (तृतीय).

# डब्ल्यूएसएफ चषक राज्य व्हॉलीबॉल स्पर्धेचा पुणे विजेता, अहमदनगर उपविजेता

आधुनिक केसरी न्यूज

**वरोरा :** वरोरा स्पोर्ट्स फाउंडेशन वरोरा,(डब्ल्यूएसएफ) व लोकशिक्षण संस्था वरोडा यांचे संयुक्त विद्यमाने आयोजित महाराष्ट्र राज्य आंतरजिल्हा व्हॉलीबॉल अजिंक्यपद पुरुष गटातील पुणे जिल्हा संघाने अहमदनगर जिल्हा संघावर चुरशीच्या लढतीत तीन 3-1 अशा सेटसनी पराभव करीत अजिंक्यपद मिळविले. तर अहमदनगर संघाला उपविजेतेपदावर समाधान मानावे लागले. तृतीय स्थानाकरीता झालेल्या सामन्यात गोंदिया जिल्हा संघाने अमरावती जिल्हा संघाचा पराभव करीत तृतीय स्थान फटकाविले. या स्पर्धेचा सर्वोत्कृष्ट खेळाडू पुणे संघाचा साईराज बांदल ठरला.

स्पर्धेचे बक्षीस वितरण लोक शिक्षण संस्थेचे अध्यक्ष प्रा श्रीकांत पाटील यांच्या हस्ते झाले तर यावेळी महाराष्ट्र राज्याचे माजी गृहमंत्री श्री अनिल देशमुख ,डॉ.विजय देवतळे, वरोरा उपविभागीय पोलीस अधिकारी नयोमी साटम, पोलीस निरीक्षक अमोल काचोरे यांनी स्पर्धेला सदिच्छा भेट दिली स्पर्धेच्या दरम्यान पत्रकार बंधू व पंच ,पदाधिकारी यांचा सत्कार करण्यात आला. याप्रसंगी वरोरा शहराचे माजी नगराध्यक्ष विलास टिपले, राजेंद्र चिकटे, विलास नेरकर, प्रा विश्वनाथ जोशी, मुनाज शेख, नरेंद्र नेमाडे, डॉ हेमंत खापणे उपस्थित होते. स्पर्धेच्या तिसऱ्या दिवशी खेळाडूंचा सत्कार सुवर्णरेखा पाटील यांच्या हस्ते झाला. याप्रसंगी मंचावर करण देवतळे, अमोल मुथा, जयंत टेमुर्डे, समीर बारई, संवर्ग विकास अधिकारी गजानन मुंडकर , संजय आंबुलकर, राहुलराखे, सुनीता उरकांडे, कल्पना देशपांडे उपस्थित होते

स्पर्धा यशस्वी करण्याकरिता महाराष्ट्र व्हॉलीबॉल संघटनेचे अध्यक्ष प्रतीक पाटील व सचिव विरल शहा यांच्या मार्गदर्शनात वरोरा स्पोर्ट्स फाउंडेशन वरोरा व लोक शिक्षण संस्था वरोडा यांनी अथक परिश्रम घेतले.



# एड्स जनजागृती कलापथकास प्रतिसाद

## लवकरच राज्य एड्समुक्त होणार

आधुनिक केसरी न्यूज

**भोकर :** मागील अनेक वर्षांपासून एड्स आजारामुळे अनेकाचा जीव धोक्यात आला होता. यातून मुक्ती मिळविण्यासाठी शासनाने खेडोपाडी कलापथकाव्दारे जनजागृती मोहीम हाती घेतली आहे. शहरातील गर्दीच्या ठिकाणी मंगळवारी ता.(सहा) शिवशक्ती कलापथक प्रमुख शाहिर रमेश गीरी आणि संचानी गीतगायन व संवादरुपी प्रबोधन केले आहे.

जिल्हा एड्स प्रतिबंध व नियंत्रण कक्ष नांदेड, महाराष्ट्र राज्य एड्स नियंत्रण संस्था याच्या संयुक्त विद्यमाने एड्स आणि गुप्तरोग प्रतिबंध उपचार आणि नियंत्रण कार्यक्रम सर्वत्र राबविण्यात येत आहे. खेडोपाडी एड्स बाबतीत अनेक समज गैरसमज निर्माण झाल्याने उलटसुलट चर्चा सुरू आहे. एड्स संदर्भात मोठ्या प्रमाणात जनजागृती झाली तर लवकरच राज्य एड्स मुक्त होईल यात शंका नाही हि खुणगाठ मनी बांधून सरकारने राज्यात विविध उपक्रमातून प्रबोधन चळवळ उभारली आहे. नव्हेतर खेडोपाडी अशिक्षित, बेरोजगार युवकांना गीताच्या माध्यमातून मार्गदर्शन करण्यासाठी विशेष तज्ञ कला पथाकाची निवड करण्यात आली आहे. शिवशक्ती कला मंच, नांदेड येथील प्रमुख शाहिर रमेश गीरी आणि त्यांच्या संचानी जिल्हा पिंजून काढला आहे. मंगळवारी शहरातील बसस्थानक परिसरात गीतगायन, संवादातून एड्स बाबतीत प्रबोधन केले आहे.यावेळी शाहिर रमेश गीरी,गायक अंबादास आव्हाड,दीलीप वंजारी,गायीका वंदना खरात, आनंद भगत(ढोलकीवादक), परमेश्वर बल्लाळ यांनी सहभाग घेतला होता.कार्यक्रमास आगार प्रमुख रविंद्र पाटील, श्रीदत्त चटलावार,बसस्थानक प्रमुख संजय काकडे,प्रकल्प व्यवस्थापक सुमीत सूर्यवंशी नांदेड,शाहिर बाबुराव गाडेकर, शाहिर माधव वाघमारे,धम्मानंद जाधव यांची उपस्थिती होती.



शहरातील विश्वसनीय
बिग सुपर मार्केट
महावीर
घर संसार



किराणा
सुका मेवा
मसाले
क्रॉकरी
प्लास्टिकच्या वस्तू
स्टीलच्या वस्तू
ॲल्युमिनियमच्या वस्तू
घरगुती उपकरणे
साफ सफाईचे सर्व साहित्य
आणि बरेच काही

सुमित 7620111118
राजेश जैन 7588348738
रमेश जैन (क्रॉकरी) 9860481142 7620111117
व्हॉट्सअपवर ऑर्डरसाठी 9850017181
वितरण स्थितीसाठी 9021395308
घाऊक चौकशीसाठी 7620111118

www.mahavirbestprice.com
sumitparakh73@gmail.com

S.P. रोड, चेलीपुरा, शहागंज, छत्रपती संभाजीनगर
प्लॉट क्रमांक A25, MIDC पोलिस स्टेशन समोर, चिकलठाणा, छत्रपती संभाजीनगर